# पद भाग क्र.१

१ :- मिनखा देह
२ :- सतगुरु महिमा
३ :- सतगुरु प्रताप
४ :- बिरह
५ :- सुरातन
६ :- भक्ति की दृढ्ताई को अंग

महत्वाची सुचना:- रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांड्क यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

* वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समझन्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

| अ.नं. | पद | पेज नं. |
|---|---|---|

पद भाग क्र.१


१ :–मिनखा देह

२ :–सतगुरु महिमा

३ :–सतगुरु प्रताप

४ :–बिरह

५ :–सुरातन

६ :–भक्ति की दृढताई को अंग

१ :–मिनखा देह

| | | |
|---|---|---|
| १ | जामो हे भारी १६३ | १ |
| २ | मन रे ओ तन अेसा लोई २२४ | ४ |

२ :–सतगुरु महिमा

| | | |
|---|---|---|
| १ | धिन धिन भाग हमारा हो १०० | ६ |
| २ | हर गुरु दोय मा जाणो हो १४१ | ७ |
| ३ | हो ज्याहाँ प्रमपद तत्त १५५ | ८ |
| ४ | म्हारा सतगुरु परम सनेही हो २४० | ९ |
| ५ | सतगुरु महिमा किजे हो ३७४ | ९ |
| ६ | वो दिन को कब उगे हो ४२१ | १० |

३ :–सतगुरु प्रताप

| | | |
|---|---|---|
| १ | डुबा था डेह मांय ११५ | ११ |
| २ | गुराजी की सरभर अवर न कोई १३१ | १३ |
| ३ | जाँ दिन ते किरपा होई रे १५८ | १४ |
| ४ | नांव कळा बिध न्यारी संतो २४९ | १५ |
| ५ | ओ कोई अरथ बतावे साधो २५३ | १६ |
| ६ | सतगुरां सा कोई सेण न देख्या ३७५ | १७ |
| ७ | सतगुरां ओंषध पाई ल्याय ३७६ | १८ |
| ८ | सतगुरु भेव बताविया  ३७७ | १९ |
| ९ | सतगुरु तारेगा मुज आन ३७९ | २० |

| | | |
|---|---|---|
| १० | तारेगा ते:तीक ३९६ | २१ |
| ११ | वा बिध सबसु न्यारी वो ४१६ | २२ |
| | ४ :–बिरह | |
| १ | असो कोई ताप बुझावे आय १६ | २४ |
| २ | हे तूं बाबल मुज परणावो हो १५३ | २४ |
| ३ | क्या मे करु उपाई संतो २१० | २५ |
| ४ | मेरे लागी हो उर शबद भाल २३४ | २६ |
| ५ | मेरे प्रितम प्यारे कब मिले हो २३६ | २७ |
| ६ | म्हारो ने संदेसो २४२ | २८ |
| ७ | पिया मे दोरी हो २७९ | २९ |
| ८ | राम मिल्या बिन हरजन दुखिया २९६ | ३१ |
| ९ | सब बिध सारण काम ३०५ | ३२ |
| १० | संतो मै तो करम अभागी ३६५ | ३२ |
| | ५ :–सुरातन | |
| १ | भगत करा ओ दास सूं ७६ | ३४ |
| २ | भगत करे जन सूरा हो ७७ | ३४ |
| ३ | हरजन हरगुन गावे हो १४५ | ३६ |
| ४ | हरिजन सुरा १५१ | ३७ |
| ५ | जम जालम हे १६२ | ३८ |
| ६ | जनसा सूर न कोई हो १६५ | ४० |
| ७ | जुग सोभा चाहुँ नहि १८७ | ४१ |
| ८ | ओर सकल बिध सेली २५६ | ४२ |
| | ६ :–भक्ति की दृढ्ताई को अंग | |
| १ | मन रे करडी बिना सब काची २२२ | ४३ |
| २ | ओ तेरे क्या न्यांव हे २५५ | ४५ |
| ३ | राम तेरी दाय पडे जुं किजे २९७ | ४७ |
| ४ | साधो भाई समझ सोच रहो गाढा ३१६ | ४८ |

१६३

।। पदराग जेतश्री ।।

**जामो हे भारी हे भारी**

**कोई धोवे संत हजारी ।। जामो हे भारी हे भारी ।।टेर।।**




जामो म्हणजे शरीरावर घातलेला चोला म्हणजे कपड्याचा पेहराव जसे आम्ही शरीरावर भारी हलके कपडे नेसतो तसे जीव हा मनुष्याचा कारजीक चोळा, देवतांचा कारणीक चोळा,नरकाचा याचनीक चोळा,चौरासी लाख योनीचा स्थुल चोळा,असे वेगळे वेगळे अनेक प्रकारचे चोळे नेसतो.या सर्व चोळ्यात मनुष्य देहाचा मोल नाही करता येत.असा भारी चोळा आहे.परंतु सर्वांना हा भेटलेला चोळा अनंत जन्माचे,अनंत प्रकारचे कर्मरुपी कीटने गंदा झाला आहे.या चोळ्याला लागलेले कर्माचा किटास धोवून मलहीन केल्यानंतर जसे जीवाचा मनुष्य देह सुटल्या नंतर वेगळे वेगळे देवादिक,नरकादिक,८४ लाख योनीचे चोळे मिळतात.तसे धोवून मलहीन केल्यानंतर ने:अंछ्रचा अमर चोळा भेटतो.हा ने:अंछ्राचा अमर चोळा आणि दुसऱ्या योनीने नाही भेटत.कारण त्या अन्य योनीत भेटलेला चोळा मनुष्य देह सारखा धोवून निर्मल नाही करता येत आणि कर्माने निर्मल झाल्याशिवाय जीवाला अमर चोळा कधी नाही भेटत.हा निर्मल होण्याची रीत फक्त मनुष्य देहात आहे.असा मनुष्य देह करोडो संतांना भेटला आहे. त्याच्यात हजारो संत बनले तरी पण सर्व संत हा चोळा धुवत नाही उलटा कर्माने जास्त गंदा करुन टाकतात.हा चोळा हजारो मध्ये बिरळा ही जीव धोतो.।।टेर।।

**ज्हाँ धोया ज्हाँ अमर हुवारे ।। आवा गवण निवारी ।।**

**सुर तेतीस सकळ सोही बंछे ।। मिलणो दुलभ बिचारी ।।१।।**

जोपर्यंत हा चोळा कर्माचा किटने निर्मल नाही होत,तोपर्यंत त्याला अमरचोळा नाही भेटत.अमरचोळा जोपर्यंत जीवाला नाही भेटत तोपर्यंत अमर चोळ्याचा जागी अन्य चोळे भेटत राहतात,परंतु अन्य चोळा भेटल्याने जन्म मरण रुपी आवागमनाचे दु:ख नाही मिटत.जसे बिरल्याने ही हा चोळा धुतला आहे.त्याचे आवागमन सदा करीता मिटून गेले आहे.या करीता सर्वचे सर्व तेतीस करोड देवता अमर चोळा मिळण्या करीता फिरुन मनुष्य देहाची चाहणा करतात.या सर्व देवतांचा देवाचा चोळा भेटण्याचा अगोदर हा मनुष्य देह रुपी भारी चोळा मिळाला होता.त्या चोळ्यात या देवतांनी कर्माने निर्मल करण्या ऐवजी जप,तप,सत या कर्मकांडाचा खूप कीट जीवावर लावला आणि अमर चोळा न भेटता देवतांचा चोळा भेटला.या देवतांचा चोळ्याने अमर चोळा नाही मिळू शकत उलट पुढे चौरासी लाख प्रकारचे दु:खाने भरलेले चोळे मिळतात. देवताचे मनुष्य शरीर सोडून स्वर्गात पोहोचल्या नंतर बुध्दी फैलते आणि देवतांचा

देवलोकात पुढ्चा आवागमनाचा मोठा धोका समजतो.या करीता हे देवता अमर चोळा मिळण्या करीता प्रभुजीला प्रार्थना करुन हाताने गमावलेला मनुष्य देहाचा चोळा परत मागतात.परंतु हा मनुष्य चोळा कितीही मागण्याची प्रार्थना केली तरी पण जो पर्यंत हा जीव देवता योनी भोगल्यावर ४३,२०,००० वर्षांपर्यंत ८४ लाख योनीचे दुःख भोगत नाही तो पर्यंत किती ही चाहना केली तरी पण मिळत नाही.असा हा मनुष्य देह रुपी चोळा मिळण्या करीता देवतांना किंवा सर्व जीवांना दुर्लभ आहे.।।।१।।

**जामा मांय अनंत गुण होई ।। जे कोई लेत बिचारी ।।**
**गेली जक्त धोय नही जाणे ।। ऊलटो कियो खुवारी ।।२।।**

या मनुष्य चोळ्यात अंनत म्हणजे अंकात मोजले नाही जात असा अमर होण्याचा भारी गुण आहे.ज्याने हा अमर होण्याची चतुर समज लावून मनुष्य शरीररुपी चोळ्याचा अनंत म्हणजे भारी गुण ओळखून घेतला.हा जीव अमर होवून गेला परंतु संसाराचे पागल नर–नारी मनुष्य चोळ्याला संचित कर्माचा किटने धोवून निर्मल करण्याची विधी शोधत नाही उलट क्रियेमान कर्म करुन संचित कर्माचा कीट अधिक मनुष्या तनाचा चोळ्यावर वाढ्वून देतात आणि चोळ्याला उलट खराब करुन अमर चोळा न घालता आवागमनाचे अंनत काळाचे दुःखाने भरलेले चोळे इच्छा नसतांना ही घालतात आणि ते चोळे घालून घालून चोळ्याचे दुःख भोगत राहतात.।।।२।।

**करसूं धुपे न लाताँ खुंद्या ।। पाहेण सिस पिछाड़ी ।।**
**जीण धोया जीण अधरज धोया ।। प्रेम नांव जळ डारी ।।३।।**

जसे येथले कपड्याचे चोळे हाताने धुतले जातात,जास्त घाण असले तर पायाने खुंदल्यावर मळ मुक्त होतात.त्याहूनही फार घाण राहीले तर चोळ्याला दगडावर आपटून आपटून धुतले जातात.परंतु हे कर्माने घाण झालेला मनुष्य तनाचा चोळा कष्ट घेवून घेवून देवतांची आणि तीन लोकाचा साधु सिध्दाची सेवा पुजा केल्याने धुतला जात नाही.उलट सेवा पुजेचा कर्म कीट चोळ्याला चिटकतो.तसेच कष्ट देऊन देऊन पायाने तिर्थाला चालून जावून धुतला जात नाही उलट तिर्थाचे कर्म चोळ्याला झिगून जातात.तसेच दगडाचा मुर्तीला जावून जावून शिश झुकवल्याने आणि दंड्वत प्रणाम केल्याने हा मनुष्य देहाचा चोळा साफ नाही होत.उलट कर्माचा किटाने जास्त गंदा होतो.ज्याचाने हा मनुष्य रुपी चोळा धुतला,त्यांनी देहाला बिना कष्ट देवून सतगुरुशी प्रेम करुन नाम जळाने धुण्याची हिकमत,प्रयोग केला. या हिकमतीने सतगुरुंनी दिलेले नाम जळाने शिष्याचा घटात रोम रोम मध्ये नाम प्रगट झाले आणि रोमा रोमात अनंत जन्माचे संचितचा रुपात चिपकलेले संचित कर्माचा किट हंस दसवेद्वार पोहोचल्यावर खाक होवून गेले आणि चोळा कर्माने साफ होवून गेला.।।३।।

जळ सूं द्यूपे न साबण दिया ।। किमत कठण करारी ।।
मुन्याँ तपस्या सीध्धा पीरां ।। धोयो नही लगारी ।।४।।

जसे येथले कपडे खारे पाण्याने कितीही साबण लावला तरी पण धुतले नाही जात,असे हट्टाने मायाचे क्रिया कर्म कितीही केले तरी पण मनुष्य चोळा धुतला नाही जात,परंतु जसे खारे पाण्याचा कारणाने कपडा साबणाने चिकट होवून जातो असे हट्टाने केलेले कर्मकांडाने वैकुंठादिक भोगण्याचे कर्म लागते आणि आवागमनाचा फेऱ्यात जीव अटकून जातो.या मनुष्य चोळ्याला धुण्याची हिकमत समजण्याकरीता फार कठीण आहे, करारी आहे.हा चोळा धुण्याची हिकमत वर वरचा बुध्दीने नाही समजत.याला समजण्या करीता झीनीहून झीनी म्हणजे उंडीहून उंडी समजची बुध्दी लागते,जसे रागी,पागी, पारखु राहतात.रागी म्हणजे गाणारा,पागी म्हणजे पायाचे चिन्ह ओळखणारा,पारखु म्हणजे हिरे पारखणारा,नाडी वैद्य आणि न्याय यांचे ज्ञान ऐकल्याने किंवा शिकल्याने घटात प्रकाशित नाही होत.हा रागी,पागी,पारखु,नाडी वैद्य किंवा न्यायाचे ज्ञान मनुष्याचा हृदयात त्या ज्ञानाची समज राहील तेंव्हा प्रकाशित होते.या प्रकारे हा मनुष्य तनरुपी चोळा धुण्याकरीता कैवल्याची झीनीहून झीनी म्हणजे उंडी समजची बुध्दी लागते.ज्याला ही झिनीहून झिनी समज आहे.तोच जीव ही आपल्या घटात ज्ञान विज्ञान प्रकाशित करु शकेल.परंतु अनेक मुनी,तपस्वी,सिध्द,पीर यांनी हा मनुष्य देहरुपी चोळा अमर करुन मायाचा कर्मकांडाने धुण्याची विधी केली परंतु यांच्यातून एक ही मनुष्य तन रुपी चोळा धुवू नाही शकले.।।।४।।

धोबी कोट निनाणू कसीया ।। बाळ जाळ गया फाडी ।।
अनंत कोट संता सो धोयो ।। कसर न भांगी सारी ।।५।।

जसे कपडे धुणे न जाणणारा धोबी मळाचे कपडे साफ करण्या करीता भट्टी वर चढवतो आणि उकळतो परंतु कसे उकळावे हे नाही समजत.या कारणाने तो धोबी कपड्यांना जाळून देतो आणि आपटून आपटून फाडून टाकतो.असे हा मनुष्य देह रुपी चोळा धुण्याकरीता नव्यान्नव कोटी मनुष्यांनी खटपट केली परंतु हा चोळा धुवू नाही शकले.उलट फाडून,जाळून अमर चोळा नाही बनवू शकले आणि या चोळ्याला बिना कामाचा करुन दिला.आदि मध्ये सुध्दा अनंत कोटी संतांनी या चोळ्याला धुण्याचा प्रयत्न केला.परंतु संचित कर्माने साफ करण्याची कसर कोणा कडूनही भागी नाही.।।५।।

पाँच ग्यान तिथंकर पाया ।। कर गया फगल बिचारी ।।
जन सुखराम धोवणे लागा ।। करडो मतो ऊर धारी ।।६।।

तिर्थंकरांनी या चोळ्याला संचितकर्म या गंदगी ने साफ करुन बेदाग केले आणि कर्महिन करुन मत ज्ञान,श्रृत ज्ञान,अवधि ज्ञान,मनपर्चे ज्ञान आणि कैवल्य ज्ञान असे पाची

ज्ञानाचा बनविला.याप्रकारे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मी पण तिर्थंकरां सारखा कड्क मत हृदयात धारण करुन माझा मनुष्य चोळ्याला धुणे शुरु केले. ।।६।।

टिप:– १)मतज्ञान–जे घडेल किंवा घडणार असेल तेच मतात येते और ते मत बदलत नसते असे जे ज्ञान आहे त्याला मतज्ञान म्हणतात और असे ज्ञान ज्याला प्राप्त झाले आहे त्यास मतज्ञानी म्हणतात.

२)श्रृतज्ञान–खरे काय किंवा खोटे काय हे सहज लक्ष्यात येते व त्यानुसार योग्य न्यायाने निर्णय घेण्याची क्षमता येते अशा ज्ञानास श्रृतज्ञान म्हणतात व असे ज्ञान प्राप्त होते त्यास श्रृतज्ञानी म्हणतात.

३)मनपर्चेज्ञान–ज्या ज्ञानात समोरच्या जिवाच्या मनात काय आहे ते सर्व ओळखण्याची क्षमता असते अशा ज्ञानास मनपर्चेज्ञान म्हणतात व हे ज्ञान ज्यास अवगत होते त्यास मनपर्चेज्ञानी म्हणतात.

४)अवधीज्ञान–ज्या ज्ञानाने दुरवरची घटना सहज सुजते अशा ज्ञानास अवधीज्ञान म्हणतात व हे ज्ञान ज्यास अवगत होते त्यास अवधीज्ञानी म्हणतात.

५)कैवल्यज्ञान–ज्या ज्ञानाने कुदरत कला प्राप्त होते व तो ज्ञानी सतस्वरुपात पोहचतो अशा ज्ञानास कैवल्यज्ञान म्हणतात व असे ज्ञान ज्याने प्राप्त केले आहे त्यास कैवल्यज्ञानी म्हणतात.

२२४

।। पदराग गोडी ।।

**मन रे ओ तन अेसा लोई ।।**

**जे कोई समज सिमरे साहेब ।। आपी क्रता होई ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज मनाला ज्ञानाने समजावून राहिलेत की,अरे मन,हे मनुष्य शरीर असे भारी आहे की या मनुष्य शरीराने जो कोणी तृप्त सुख देणाऱ्या कर्त्याला समजून त्याचे स्मरण करेल तर तो स्वत: सुखांचा कर्ता बनून जाईल त्याला सुख मागण्यासाठी कोणाजवळ जावे लागणार नाही.।।टेर।।

**या तन सुं उजळ घर जावे ।। इण सुं राजा होई ।।**

**या सूं रूप करूप बंधाणा ।। सुख दु:ख पावे लोई ।।१।।**

अरे मन,या शरीराने उंच कर्म,करण्या केल्याने जीव उत्तम घरात जन्म घेतो.याच मनुष्य शरीराने तप केल्याने चक्रवर्ती समान राजा बनतो की ज्याच्या राज्यात सूर्य डूबत नाही(इतके मोठे त्याचे राज्य पसरलेले असते)अरे मन,या मनुष्य शरीराने तीर्थ केल्यावर रुपवान बनतो व याच मनुष्य शरीराने निच विकारी वासनांचे क्रिया कर्म

केल्याने व पापकर्मे देवी–देवतांची भक्ती केल्याने त्याचे मुख कोणीही पाहणे पसंद करत नाही असा किळस उपजणारा कुरुपवान बनतो.।।१।।

**ईण सूं दीन दुनि सिर होई ।। या सूं सुरगां जावे ।।**
**इण सूं पीर पैकंबर कहाणा ।। फिर अवतार कहावे ।।२।।**

अरे मन,मनुष्य देहाने करणी करुन गरीब होतात तर त्याचप्रमाणे जगाच्या वर(वसिष्ठ) होतात.अरे मन,या शरीराने जत,सत,तप पाळल्याने स्वर्ग मिळतो.अरे मन याच मनुष्य शरीराने करणी करुन करामाती पीर व पैगंबर बनतात.याचप्रकारे याच नर तनाने करण्या साधून रामचंद्र,कृष्ण सारखे अवतार बनतात.।।२।।

**मिनषा देहे अमोलक हीरो ।। अेसो अवर न कोई ।।**
**इण सूं सेंस महेसर देवा ।। या सूं भगवत होई ।।३।।**

असे हे मनुष्य तन अमोलक म्हणजे अनमोल हिरा आहे.असे मनुष्यासारखे ३ लोक १४ भवनात दुसरे कोणते तन नाही आहे अरे मन,या मनुष्य देहाच्यासारखे ३ लोक १४ भवनात सतलोकाचा राजा ब्रम्हाचा देह,वैकुंठचा राजा विष्णुचा देह,कैलासचा राजा शंकराचा देह व ब्रम्हा,विष्णु,महादेवला उपजवणारी शक्तीचा देह ही नाही आहे.असा हा मनुष्य देह आहे.याचा थोडासाही मोल करता येत नाही असा हा अनमोल हिरा आहे.अरे मन,याच्याने पन्नास कोटी योजन पृथ्वी सहजात तिचे वजन माहित न होता शिरावर धारण करणारा शेषनाग बनतो.अरे मन,संहार करणारा महेश,उत्पत्ती करणारा ब्रम्हा,पालन पोषण करणारा विष्णु,ब्रम्हा,विष्णु,महादेवाला प्रगट करणारी शक्ती याच मनुष्य तनाने करण्या करुन बनते.याच मनुष्य तनाने भगवंत म्हणजे सुध बुध ने कर्म कापून तिर्थकर बनतात.।।३।।

**इण में उलट आद घर पोंचे ।। या में केवळ होई ।।**
**इण सूं देव सकळ तन सारा ।। इण सम अवर न कोई ।।४।।**

अरे मन याच मनुष्य तनाने ओअमची साधना करुन लाखो वर्षापर्यंत काळाकडून पकडले न जाणारे आदघर म्हणजे भृगुटीचे वासी बनतात.अरे मन,याच मनुष्य तनाने कधीही काळ पकडू शकत नाही अशा दहाव्याद्वारच्या आद घरात पोहचता येते अरे मन,याच मनुष्य तनाने सोहम अजपाचा जाप करुन पारब्रम्ह केवली बनतात व याच मनुष्य तनाने पारब्रम्हच्या केवलीच्या पलीकड्चा तिर्थकर केवली बनतात तर याच मनुष्य तनाने पारब्रम्ह केवली व तिर्थकर केवलीच्या पलीकडील सतस्वरुप केवली बनता येते.अरे मन,याच मनुष्य शरीराने करण्या करुन सर्व देवताचे तन बनले व याच मनुष्य तनाने एकशे एक यज्ञ करुन तेहतीस कोटी देवतांचा राजा बनतो असे हे मनुष्य तन आहे.या मनुष्य तनासारखे ३ लोक १४ भवन व ३ ब्रम्हच्या १३ लोकात कोणता देह नाही.हा

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

सृष्टी बनविणारा पारब्रम्ह(होनकाळ) कर्ताराचा देह ही या मनुष्य देहासारखा नाही.।।४।।

**ओ सूण जनम इसो हे भाई ।। तिण मे फेर न सारा ।।**
**के सुखराम समज मन मेरा ।। सिमरो सिरजण हारा ।।५।।**

अरे भाउ मन असा हा मनुष्य जन्म आहे.याच्या अनमोल अनंत गुणात केसा सारखी ही कसर नाही म्हणून हे माझे मन तू समज व तुला ज्याने हे अनमोल मनुष्य तन दिले त्या तन देणाऱ्या सिरजनहारचे स्मरण कर व स्वत: सिरजनहार सारखा सुखांचा कर्ता बनून जा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगता आहेत.।।५।।

१००

।। पदराग धनु प्रभाति ।।

**धिन धिन भाग हमारा हो**

**धिन धिन भाग हमारा हो ।। मेरा सतगुरू द्वार पधारे हो ।।टेर।।**

माझे भाग्य धन्य आहे धन्य आहे. माझे सतगुरु माझ्या द्वारी आले आहेत.।।टेर।।

**करम कीट सब भागे हो ।। मेरा ताळा उदे होय जागे हो ।।१।।**

त्यांच्या प्रतापाने माझे काळकर्माचे सर्व किट मिटून गेले व माझी रामजी सोबत लिव जागृत होऊन गेली.।।१।।

**दुबध्या दुरमत भागी हो ।। राम रटण लिव लागी हो ।।२।।**

माझी विषय वासनांची कुमती,दुरमती,दुविधा मिटून गेली व मला राम रटण्याची लीव लागून गेली.।।२।।

**भरम अग्यान नसाया हो ।। परम चेन सुख आया हो ।।३।।**

माझे भ्रम,अज्ञान नष्ट होऊन गेले व माझ्यात परमचेन,परमसुख प्रगट होऊन गेले.।।३।।

**बिष रस सब मिट जावे हो ।। इमरत सीरा आवे हो ।।४।।**

माझे विषय रस मिटून गेले व माझ्या घटात अमृताच्या रसाची सीर म्हणजे धार उदय होऊन गेली.।।४।।

**आन देव सब भागे हो ।। म्हारा राम राज उर जागे हो ।।५।।**

माझ्या हंसाच्या ह्रदयातून रामजी सोडून सर्व अन्य देवता पळून गेले(निघुन गेले)व माझ्या ह्रदयात रामजीचे राज्य जागृत झाले.।।५।।

**असंख जुगा के मांही हो ।। सतगुरू सम कोइ नाही हो ।।६।।**

मी असंख्य युगात भटकलो,परंतु मला तीन लोक चौदा भवनात सतगुरु सारखे कोणी दिसले नाही.।।६।।

**सांसाँ सोग मिटाया हो ।। जां घर सतगुरू आया हो ।।७।।**

ज्या दिवशी माझे सतगुरु माझ्या द्वारी आले त्याच दिवशी माझी संसाराची चिंता,फिकीर व मृत्युनंतरचे काळाच्या यातनांनी ओतप्रोत भरलेले भारी दु:ख मिटून गेले.।।७।।

**बेद कुराण सरावे हो ।। गुरू मेहेमा हर गावे हो ।।८।।**

ब्रम्हाने वेद,महंमदने कुराणात जीवाला काळापासुन मुक्त करण्याचा सतगुरु प्रताप वर्णन केला आहे.।।८।।

**केहे सुखराम सुणाई हो ।। गुरा सम नहि धर माही हो ।।९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की गुरु सारखे तीन लोक चौदा भवनात देवी,देवता,ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती,इंद्र,अवतार इ.कोणीही नाही.।।९।।

१४१

।। पदराग केहरा ।।

**हर गुरू दोय मां जाणो**

**हर गुरू दोय मा जाणो हो साधो ।। ग्यान करो सुण ठाणो हो ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हर आणि सतगुरु यांना दोन करुन वेगळे वेगळे समजु नका.सतज्ञानाने विचार करा आणि समजून घ्या की हर आणि सतगुरु एकच आहे का वेगळे आहे तर समजेल की हर आणि गुरु आदिपासून एकच आहे.(गंगेचे उदा.)।।टेर।।

**असंख जुगाँ में हर गुरू अेकीं ।। न्यारा नहि बखाणो हो ।।१।।**

असंख्य युगापासुन सर्व ज्ञानी,ध्यानी हर आणिगुरु एकच आहे वेगळे वेगळे दोन नाही आहे असे ज्ञानाने समजावत आले आहे. ।।१।।

**सबद भेद सो ब्रम्ह कहिजे ।। दे मुख होय सुणाणो हो ।।२।।**

सतगुरुचा देहाने शिष्यात प्रगट झालेला सतशब्द आणि खंड ब्रम्हंड्चा पलीकड्चे सतस्वरुपाचा सतशब्द एकच आहे हे दाने नाही आहे.हा सतशब्द सतगुरु आपल्या देहाचा  मुखाने शिष्याला सांगतात.।।२।।

**गुरू मिलिया जब हरजी मिलिया ।। अंतर नाँही रेहाणो हो ।।३।।**

सतगुरु मिळाल्यावर ही रामजी मिळतात.सतगुरु नाही मिळाले तर खंड ब्रम्हंडाचा पलीकड्चे सतस्वरुपाला कितीही रटले तरीही सतस्वरुप रामजी म्हणजे सतब्रम्ह घटात प्रगट नाही होत. सतगुरु मिळाल्यावर रामजी भेटण्यात कोणतीही कसर नाही राहत.या करीता सतगुरु आणि हर वेगळे वेगळे आहे.हे ह्रदयात अंतर ठेवू नका. ।।३।।

**गुरू पूज्या ज्याहाँ हर कूं पूज्या ।। न्यारा नाहि रेहाणो हो ।।४।।**

सतगुरुची पूजा,सतगुरुची सेवा म्हणजेच रामजीची पुजा,रामजीची सेवा केली हे होते.या करीता गुरुची पूजा केली त्याचात हरची पूजा करण्यात काही बाकी नाही राहीले. ।।४।।

**तिरिया जाय करे प्रसादी ।। बाळक माँही अघाणो हो ।।५।।**

जसे गर्भवती स्त्रीचा घटात बालक राहतो.तो बालक स्त्रीला भोजन दिल्याने धापून जातो तसे ही सतगुरुचा घटात रामजी राहतात ते रामजी सतगुरुची पुजा केल्यावर प्रसन्न

होतात.या करीता गुरुची पूजेतही रामजीची पूजा आहे,रामजीची पूजा गुरुचा पूजेपेक्षा वेगळी नाही आहे. या करीता हर आणि सतगुरुत अंतर नाही ठेवायचे. ।।५।।

**पेड सिंचिया सब सुख पावे ।। डाळा बीज डेहाणो हो ।।६।।**

जसे झाडाच्या मुळास पाणी दिल्याने झाडाच्या सर्व फांद्या,पान,फूल,फळ,बी या सर्वांना एकसारखे पाणी भेटते,कमी जास्त नाही मिळत या प्रकारे सतगुरुला पूजण्याने रामजी पूजले जातात. ।।६।।

**जन सुखराम मोख जो चहिये ।। तो गुरूं सूं दूर न जाणो हो ।।७।।**

या करीता मोक्ष पाहिजे असेल तर गुरु हेही रामजी आहे हे जानून गुरुला पूजले पाहिजे. गुरु आणि रामजी न्यारे आहे हे समजून गुरुपासून दूर नाही गेले पाहीजे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।७।।

१५५

।। पदराग धनु प्रभाति ।।

## हो ज्याहाँ प्रमपद

**हो ज्याहाँ प्रमपद तत्त दीयो हो ।। मेरा भरम बिंधुसण कीया हो ।।टेर।।**

माझ्या घटात परमपद,परमतत्त प्राप्त करवून माझे भ्रम नष्ट करुन देणारे सतगुरु मला केंव्हा मिळतील?।।टेर।।

**वे जन को कब आसी हो ।। वे सत्त लोक का बासी हो ।।१।।**

जे सतस्वरुप सतलोकात राहतात म्हणजे सतस्वरुप ब्रम्हांडात राहतात असे सतगुरु मला केंव्हां भेटतील?।।१।।

**निरभे मो कूं कीया हो ।। प्रममोख पद दीया हो ।।२।।**

जे मला काळाच्या भयापासून निर्भय करुन परमसुखाचे पद देतील असे सतगुरु मला केंव्हां भेटंतील?।।२।।

**धिन धिन वा पुळ कुवासी हो ।। जां दिन सतगुरू आसी हो ।।३।।**

तो क्षण तो दिवस धन्य राहील ज्या दिवशी मला माझे सतगुरु भेटतील.।।३।।

**चरणा सीस निंवासुं हो ।। सन मुख दर्शण पासु हो ।।४।।**

मी अश्या सतगुरुच्या सन्मुख जाउन त्यांच्या चरणावर माझे मस्तक केव्हा नमउ?व त्यांचे दर्शन मला केंव्हा होतील?।।४।।

**उन सुरत की बल हारी हो ।। जाहाँ दीया ग्यान बिचारी हो ।।५।।**

ज्या मुखाने सतगुरु भ्रम नष्ट करण्याचे सतज्ञान जगाला देतात व मलाही ते सतज्ञान देतील अश्या माझ्या सतगुंरुच्या सुरत वर मी माझे प्राण ओवाळून टाकतो.।।५।।

**सुखदेव बोहो दुख पावे हो ।। ये दिन दुबरा जावे हो ।।६।।**

जोपर्यंत असे सतगुरु भेटत नाही तोपर्यंत प्रत्येक क्षण काढणे मलां फार दोरी म्हणजे

कठीण जाऊन राहीले आहे.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।६।।

२४०

।। पदराग धनु प्रभाति ।।

**म्हारा सतगुरू परम सनेही हो**

**म्हारा सतगुरू परम सनेही हो ।। राम मिल्या इण देही हो ।।टेर।।**

सतगुरु माझे परमस्नेही आहेत.माझे परम हिंतचिंतक आहेत.त्यांच्या कृपेने माझ्या घरात मला रामजी मिळाले.।।टेर।।

**जीवत मोख मिलाया हो ।। करम खोद सब बहाया हो ।।१।।**

माझ्या सतगुरुंनी मला जिंवतपणीच मोक्षात मिळवून दिले.माझ्या सतगुरुंनी भवसागरात ठेवणारे माझे सर्व कर्म खोदून खोदून पाण्यात वाहून दिलेत.।।१।।

**रूप न चूप न काया हो ।। वो मुज देस बताया हो ।।२।।**

सतगुरुंनी मला येथील पाच तत्वासारखे जेथे रुप व काया नाही किंवा विषय सुख नाही असा सतस्वरुप देश दाखविला.।।२।।

**भींत दिवाल न पाया हो ।। ऐसे अधर घर आया हो ।।३।।**

सतगुरुंनी मला ज्या देशात घरांना माती,दगडाच्या भिंती नाही आणि जेथे सत विज्ञानाचे अजब घर आहेत तेथे पोहचविले.।।३।।

**चंद न सूर न देवा हो ।। वाँ घर का सुख लेवा हो ।।४।।**

सतगुरुंनी मला ज्या देशात येथील देशा सारखे चंद्र किंवा सुर्याचा प्रकाश नाही अशा दिव्य उजेडाच्या घरी पोहचविले. तेथे मी अजब सुख घेऊन राहीलो आहे.।।४।।

**ब्रम्हा बिसन कुवावे हो ।। ऊण घर कूं नित ध्यावे हो ।।५।।**

ज्या घरास ब्रम्हा,विष्णु,महादेव प्राप्त करण्याची नित्य आशा करतात अश्या घरास सतगुरुंच्या दयेने मी प्राप्त केले आहे.।।५।।

**कह सुखराम सुणाई हो ।। हम मिल्या आद घर जाई हो ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मी सतगुरुच्या दयेने सतस्वरुपाच्या महासुखाच्या आदि घरी पोहचलो.।।६।।

३७४

।। पदराग धनु प्रभाति ।।

**सतगुरू मेहेमा कीजे हो**

**सत्तगुर म्हेमा कीजे हो ।। तन मन धन सब दीजे हो ।।टेर।।**

सतगुरुंना तन,मन,धन देऊन सतगुरुंची महीमा करा.।।टेर।।

**वे मोख मुगत का दाता हो ।। वां बिन नरका जाता हो ।।१।।**

सतगुरु मुक्तीचे दाता आहेत ते भेटले नसते तर मी महादु:ख भोगत नरकात पडलो

असतो.।।१।।

**सुण मन तोहिज बतावे हो ।। गुरू बिन धाम न जावे हो ।।२।।**

अरे मन,ऐक तुला सतगुरु मिळाले नसते तर तू मोठ्या सुंखाच्या धामास कधी पोहचला नसता हे मी तुला सांगत आहे.।।२।।

**प्रेम सहेत सब कीजे हो ।। गुरू अग्यामे रीजे हो ।।३।।**

अरे जीव,गुरुशी कुटूंब परिवारापेक्षा ही अधिक प्रेम कर व त्यांच्या आज्ञेत रहा.।।३।।

**वां सुं कछू न दुरावो हो ।। ज्याँ कर साहेब पावो हो ।।४।।**

ज्यांच्या दयेने साहेब घटात प्राप्त झाला अश्या सतगुरुच्या विचारांपासून कधी दूर होऊ नकोस.।।४।।

**जुग जुग करम कमावे हो ।। गुरू सरणे सब जावे हो ।।५।।**

मी युगायुगापासून आज पर्यत जितके ही काळाचे कर्म कमावले ते सर्व कर्म गुरुच्या शरणात येताच मिटून गेले.।।५।।

**गुरू पूज्या सुख पायो हो ।। प्राण आद घर जावे हो ।।६।।**

सतगुरुची पुजा म्हणजे शरणा घेतल्याने माझा प्राण सतस्वरुपाच्या आद घरी पोहचून गेला असे माझे सतगुरु धन्य आहे,धन्य आहे.।।६।।

**सतगुरू अेसा कुवावे हो ।। सुखदेव भेद बतावे हो ।।७।।**

असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या सर्व स्त्री पुरुषांना ज्ञानाने सतगुरुच्या सत्तेचा भेद सांगून राहीले.।।७।।

४२१

।। पदराग धनु प्रभाति ।।

**वो दिन को कब ऊगे हो**

**वो दिन को कब ऊगे हो ।। मेरा प्राण आद घर पुगे हो ।।टेर।।**

माझे प्राण सतस्वरुपी आदि घरी पोहचेल तो दिवस कधी उगवेल.।।टेर।।

**धिन धिन वा पुळ क्काई हो ।। मेरे ध्यान लगे सुन माही हो ।।१।।**

माझे ध्यान(चित्त)ब्रम्ह शुन्यमध्ये लागेल तो क्षण माझ्यसाठी धन्य राहील,धन्य राहील. ।।१।।

**त्रिबेणी तट धारा हो ।। कब न्हावे प्राण हमारा हो ।।२।।**

माझे प्राण गंगा,यमुना,सरस्वतीच्या त्रिवेणी संगमात अंघोळ करील,तो दिवस केव्हां येईल?।।२।।

**जोत अखंडत मांही हो ।। कब जन देखे जाही हो ।।३।।**

मी घटातील अखंडीत सतस्वरुपाची ज्योत म्हणजे उजाला(प्रकाश)केंव्हा बघेल?।।३।।

**त्रिगुटी स्हेर मंजारा हो ।। कब आसण होय हमारा हो ।।४।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

माझे घर त्रिगुटीच्या शहरात केंव्हा होईल?तेथे आसन म्हणजे नेहमी राहण्याची जागा केंव्हा होईल?।।४।।


**कह सुखराम बिचारो हो ।। अब मोय पार उतारो हो ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात(बोलतात)की मी सतस्वरुप आदि घरी केंव्हा पोहचेल व भवसागर केंव्हा पार करेल?या विचारांनी माझा प्राण रात्रं-दिवस चिन्तीत राहतो.याकरीता सतगुरु महाराज आपण मला लवकर भवसागर पार करुन द्या व सतस्वरुपाचा आदि घरी पोहचवून द्या,ही माझी आपल्याला विनंती आहे.।।५।।

११५

## प्रस्तावना

परात्परी पासून दोन पद आहेत.




आम्ही आदि पासून पारब्रम्ह मध्ये होतो.तेथे आम्हाला सुखाची चाहना होती.त्या चाहनेच्या प्रति आम्ही पारब्रम्ह आणि त्रिगुणीमाया पासून उपजलेले त्रिगुणीमायाचे ३ लोक १४ भवनाचे मृत्युलोकात आलो आणि त्या लोकात त्रिगुणी मायाच्या विकारी वासनांचा कारणाने आम्ही येथे अटकलो आणि महादु:खात पड्लो.जसे सागरात डोह राहतात,त्या डोहात जर कोणी फसून गेला तर त्याचे निघने फार अवघड राहते.त्याला तेथून फक्त कोणी एखादा समुद्राचा जानकार गोताखोरच काढू शकतो.तसेच भवसागर म्हणजे विकारी मायाच्या सागर,डोह म्हणजे या त्रिगुणी मायाची वेग-वेगळ्या वासना काम,क्रोध,मद,मोह, लोभ,मत्सर,चौसठ लक्षण(शुभ+अशुभ)तीर्थ,व्रत,उपवास इ.याच्यातून मला सतगुरुंनी काढले आणि कसे काढले हे पण सांगतो.

।। पदराग गुड ।।

**डुबा था डेह माय नही तर डुबा था ।।**
**म्हारा सतगुरू काड्या आय ।। नही तर डुबा था ।।टेर।।**


मी डोहात बुडून राहीला होतो माझ्या सतगुरुंनी मला काढले.नाही तर मी डोहात बुडून मरुन राहीलो होतो.।।टेर।।

**काम क्रोध मद लोभ में हो ।। सब जग डुबो आय ।।**
**सतगुरां हेलो पाडीयो हो ।। मेंर सुण्यो वां जाय ।। १ ।।**

काम,कोध,लोभ,मोह,मत्सर अहंमच्या,अहंकाराच्या डोहात सर्व जगाचे स्त्री-पुरुष बुडून राहीले आहेत.मी पण सर्व जगाच्या नर-नारी सारखा बुडत होतों.सतगुरुंनी काम,कोध, लोभ,मोह,मत्सर,अहम इ.डोहातून कसे वाचवायचे याचे ज्ञान ओरडून-ओरडून सर्व बुडणाऱ्यांना सांगीतले ते सतगुरुंचे ज्ञान मी लक्ष्य देऊन ऐकले.।।१।।

**दोय नेजा गुरू लाईया हो ।। पिड़ी एक बणाय ।।**

दोय नर लागा खेंचणे हो ।। युं गुराँ काड्या आय ।।२।।





सतगुरुनी मला डोहातून काढण्याकरीता ओअम,सोहम अश्या श्वासाच्या दोन दोऱ्या आणल्या आणि त्या दोरीला एक रामनामाचा शब्द(पिडी) लावला.तसेच निजमन आणि निजचित्त ह्या दोन पुरुषांना मला डोहातून खेचण्यास लावले अश्या प्रकारे सतगुरुंनी मला डोहातून काढले नाहीतर मी डोहात बुडून राहीलो होतो.।।२।।

सेजां सेजां काडीयां हो ।। जतन किया ब्हो भाँत ।।
बली हारी गुरूदेव की हो ।। काड्या कर कर ख्याँत ।।३।।

माझ्यावर एक ही कष्ट न पडू देता सहजातच(आरामात)डोहातून काढले व डोहातून काढते वेळी परत डोहात पडणार नाही अशी काळजी घेतली(असे जतन केले).गुरुदेवांनी लक्ष्य देवून मला काढले नाहीतर मी बुडून गेलो असतो याकरीताच माझ्या गुरुदेवांचा मी बलिहारी आहे.।।३।।

भवसागर सूं काड कर हो ।। गिरवर चाड्यो मोय ।।
तिन लोक लारे रया हो ।। भौसागर क्या होय ।।४।।



गुरुदेवांनी भवसागरातून काढून पर्वतावर चढवून दिले ३ लोकांच्या वर गगनात चढवून दिल्याने मला ३ लोकाच्या भवसागराच्या डोहाची आता थोडी ही भिती राहीली नाही.।।४।।

पाँच पुरस दोळा हुया हो ।। जाण न देवे मोय ।।
सतगुरां भेद बताई या हो ।। चड्या पिछाडी होय ।।५।।

पाच पुरुष–शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध मला आड्वे येवून घेरुन घेरुन भवसागरात खेचत होते.भवसागराच्या बाहेर जाऊ देत नव्हते.सतगुरुंनी रेचक,पुरक सोबत अमाउ कुंभक केल्याने हे पाच पुरुष सहजच मरुन जातात हा भेद दाखविला आणि मी भेदाच्या अनुसार अमाउ कुंभक करताच हे पाच पुरुष माझ्या पासून वेगळे झाले आणि मी पश्चिमच्या रस्त्याने चढू लागलो उदा. शेंगदाणा
ह्या पाची आत्मा आपले मरण पाहून आपल्या पूर्ण ताकदीने या हंसाला त्रिगुणी मायेत लावण्याचा प्रयत्न करतात.।।५।।

निसरणी होय चड़ गया हो ।। सतगुरां के प्रताप ।।
जन सुखदेवजी पोंचीया हो ।। ज्हाँ निरंजन आप ।।६।।

पर्वतावर चढण्याकरीता सिढी असते.तशी सिढी सतगरुंच्या प्रतापाने माझ्या घटात बनून गेली आणि पश्चिमेच्या रस्त्याने चढून जेथे निरंजन काळाच्या पलिकडेचा खुद्द

(स्वःत)निरंजन साहेब आहे तेथे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात मी पोहचून गेलो.।।६।।

१३१

।। पदराग कानडा ।।

## गुराजी की सरभर अवर न कोई

**गुराजी की सरभर अवर न कोई ।। तीन लोक फिर देख्या हे लोई ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की,मी ब्रम्हाच्या सतलोकात, विष्णुच्या वैकुंठात, महादेवाच्या कैलासात ,शक्तीच्या शक्तीपुरीत इंद्राचा इंद्रपुरीत व मृत्युलोकांतील सर्व ज्ञानी,ध्यानीयांच्या धामात सगळीकडे फिरलो परंतु मला तीन लोक चौदा भवनात अमर पद प्राप्त करुन देणारा सतगुरु सारखा अमरलोकात पाठविणारा कोणीच कोठेही दिसला नाही.।।टेर।।

**अेसा गुरू भेव बतायाँ सांई ।। सेजाई सेज मिल्या पद मांई ।।१।।**

मला सतगुरुंनी स्वामीचा असा भेद दाखविला की मी सहजमध्ये अमर पदास मिळुन गेलो.।।१।।

**देहिके मांय दिखाया देवा ।। तीन लोक सिर निज तत भेवा ।।२।।**

मला माझ्या देहितचे निरंजन देव दाखविला हा निजतत्त म्हणजे निरंजन देव तीन लोकातील सर्व देवांच्या वरचा देव आहे.।।२।।

**बिन कर पाँव गिगन सिर आया ।। बिन नेणा हर दर्सण पाया ।।३।।**

जसे येथे गीगणात म्हणजे पहाडावर असलेल्या देवाचे दर्शन घेण्याकरीता गेल्यास पायाचे चढण्याचे काम पड्ते,हाताने पहाडाचा टेका घेण्याची गरज पड्ते व मग पहाडावर चढुन गेल्यावर डोळ्याने देवाचे दर्शन घेण्याचे काम पड्ते त्याचप्रमाणे मला गिगणात चढण्याकरिता हाता पायाची एकाचीही गरज पड्ली नाही मी सहजात बिना हाता पायाच्या आसऱ्याने गिगनात चढुन गेलो तेथे मला बिना डोळ्याने हरीचे दर्शन झाले.।।३।।

**आपज जोत ऊजियाळो माही ।। दसवे द्वार निरंजण सांई ।।४।।**

जसे पहाडात अंधारात तेल तुपाच्या ज्योतीने देवाचे दर्शन घ्यावे लागते त्याप्रमाणे मला घटात दहावेद्वारी निरंजन साईच्या ज्योतीनेच निरंजन साईचे दर्शन झाले.।।४।।

**कह सुखराम अमरपद पाया ।। जां बिछड्या तां मांय संभाया ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात मी अमर पदाला पोहचलो आता माझे जन्म मरण्यात पडण्याचा काळाचा देश सुटला व मला जेथे जन्मने नाही,मरणे नाही असे अमर पद मिळाले मी अनंत युगापूर्वी ह्या पदात होतो परंतु मन व पांच आत्माच्या विषय वासनेने कर्म करीत ह्या पदाला सोड्ले व युगान युग काळाच्या जन्म मरणाचे

दु:ख भोगुन तीन लोक चौदा भवनात फिरत राहीलो सतगुरुंनी माझे कर्म विषय वासनेत टाकणारे मन,पाच आत्मा मारुन दिल्या व जेथे विषय वासना नाही अशा सतस्वरुपी ब्रम्ह मध्ये दहाव्याद्वारी माझ्या मन व पाच आत्मामध्ये लिपटलेल्या जिवाचा कोरा ब्रम्ह करुन सतस्वरुप ब्रम्ह मध्ये समावुन दिले.।।५।।

१५८

।। पदराग धनाश्री ।।

## जाँ दिन ते किरपा होई रे

**जाँ दिन ते किरपा होई रे ।। नीतर भूला जाय ।।**
**अंतर मे आख्याँ खुली रे ।। सतगुरू मिलिया आय ।।टेर।।**

हे साई तुझ्या दरबारात व गर्भात तुझीच भक्ती करेन हा करार मी तुझ्याशी केला होता,परंतु जगात आल्याबरोबर मनाच्या वासनांमुळे तुझी भक्ती करण्याचा करार विसरुन गेलो.विषयरस व अन्यदेवतांच्या भक्तीत लागून गेलो.जेंव्हा मला सतगुरु मिळाले,त्यांनी ज्ञान कृपा केली तेंव्हा माझ्यातील आतील ज्ञानाची दृष्टी उघडली व मला तुझा करार आठवला.कराराचे पालन न केल्याने माझ्यावर पडणारे काळाचे दु:ख दिसायला लागले.।।टेर।।

**शब्द सुण्या तन थर हऱ्या रे ।। रहया राम लिव लाय ।।**
**इमरत घूटाँ रस पीया रे ।। ज्युँ मिसरी मुख माँय ।।१।।**

सतगुरुंच्या मुखाने ज्ञान ऐकल्या बरोबर माझ्या शरीराचे रोम रोम कापू लागले व रामनामाची लिव मला लागून गेली व माझ्या घटात सतशब्द प्रगट होऊन गेला.माझ्या मुखात मिसरीहून(खडीसाखर)अधिक गोड असा अमृताचा रस टपकू लागला व तो रस मी पीत राहीला.।।१।।

**भूक प्यास तन में नहिरे ।। युं दरसे तन माँय ।।**
**सासा दीसे आँवतो रे ।। कड़वो मीठो खाय ।।२।।**

या अमृतरसाच्या सुखाने माझ्या शरीराची भुख,तहान मिटून गेली.माझ्या शरीरात मला श्वासा-श्वासात सुख दिसू लागले.माझ्या श्वासा-श्वासात गोड रस निपजत होता.तो रस मी पीत होतो मी आतापर्यंत कडू खात होतो त्या जागी मी गोड खाऊ लागलो. ।।२।।

**ज्यूँ तन काँपे ढांड सूं रे ।। प्रगट छानो नाय ।।**
**जन सुखदेव केहे सांभळो रे ।। सबद लग्यो उर माँय ।।३।।**

जसे कोणाच्या घटात खूप थंडी भरल्याने शरीर कापते व ते कापणे लपविल्यानेही लपत नाही,प्रगट दिसते.तसे माझे शरीर सतशब्द प्रगटल्याने कापून राहीले होते ते कापणे मला दिसत होते ते लपविल्यानेही लपत नव्हते.आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात

याचप्रकारे शब्द माझ्या हंसाच्या हृदयात लागून गेला.।।३।।

२४९

।। पदराग भेरू (प्रभाती) ।।

**नांव कळा बिध न्यारी संतो**

**नांव कळा बिध न्यारी संतो ।। नांव कळा बिध न्यारी ।।**

**जो जाण्यो सो पार पहूंता ।। ओर वार का वारी ।।टेर।।**

सतनाम कळा ही होणकाळाच्या सर्व मायेच्या कलांहुन वेगळी आहे.ज्याने सतनाम कळा जाणली आहे ते संत होणकाळाच्या पलीकडच्या महासुखाच्या सतस्वरुप आदि घरी पोहचतात.हे संत सोडून अन्य सर्व मायेमधील कला धारण केलेले साधू महासुखाच्या आदि घरी न पोहचता इकडेच काळाच्या महादु:खात अटकुन राहून जातात.।।टेर।।

**माळा फेर साध पच मूवा ।। पिंडा कर कर सेवा ।।**

**अरथ करे कर ग्यानी थाका ।। नेक न पायो भेवा ।।१।।**

माळा फिरवित फिरवित साधू थकून मरुन जातात,पंडे मूर्त्यांची,तिर्थांची सेवा करुन करुन मरुन जातात आणि ज्ञानी वेदांचे ज्ञान शोधून शोधून थकून जातात परंतु कोणालाही सतनाम कळेचा भेद थोडासा ही मिळत नाही.।।१।।

**राग छतीस राग बंध गावे ।। गुण प्रगटावे लाई ।।**

**पच पच मुवा रात दिन सारा ।। कुद्रतकळा न पाई ।।२।।**

रागी रागाला राग घटात ठेवून गुण प्रगट करण्याकरीता रात्रंदिवस पचतो व रागाचा गुण प्रगट करुन घेतो परंतु इतके रात्रदिवस पचून ही कुद्रतकळा थोडीशीही प्राप्त करत नाही. काळाच्या मुखातच राहतो.।।२।।जसे-दिपक(विठ्ठलराव संवाद)

**जोगी आंत धोय पच मूवा ।। गिगन चडावे वाई ।।**

**जप तप माय पच्या सन्यासी ।। वा बिध नेक न पाई ।।३।।**

कित्येक योगी आपले आतडे धुवून धुवून मरुन जातात व कित्येक योगी भृगुटी गगनात ओअम श्वास चढवून काळापासुन युगानयुग वाचत राहतात,शेवटी खाली येतात व काळाचा ग्रास बनून जातात परंतु काळापासुन मुक्त होण्याची थोडीशीही सतनाम कळा प्राप्त करत नाही.संन्यासी जपामध्ये,तपामध्ये पचून पचून थकून जातात परंतु लेशमात्रही सतनाम कलेची विधी प्राप्त करत नाही.।।३।।

**बेद लभेद भेद पच थाका ।। ने:अंछर नहि पायो ।।**

**हद कूं छाड गयो बेहद मे ।। तोही रीतो फिर आयो ।।४।।**

वेद म्हणजे ब्रम्हा,नारद,व्यास इत्यादी लबेद म्हणजे शक्ती,शेष,विश्वकर्मा,श्रीयादे इत्यादी, भेद म्हणजे महादेव,मच्छिंद्रनाथ,गोरक्षनाथ इत्यादी हे सर्व कष्ट करुन करुन थकून गेले तरीही यांना कोणलाही ने:अक्षर मिळाले नाही.काही संत हद म्हणजे तीन लोक चौदा

भवनाला ओलांडुन बेहद म्हणजे पारब्रम्हलाही पोहचतात तरीही नावकला मिळत नाही रिकामेच्या रिकामे राहून जातात व तेथे नेहमी न राहता गर्भात येऊन पडतात.।।४।।

**आतो कोयन पावे कबहू ।। नाव पराक्रम भाई ।।**
**ओऊं सोऊं जाप अजप्पो ।। ये सब पवना मांई ।। ५ ।।**

कित्येक साधू ओअम व सोहम अजप्पाला जपतात व जेथून पवन म्हणजे श्वास उगतो अशा पारब्रम्हच्या पदामध्ये पोहचतात परंतु हे कोणी नाव पराक्रम प्राप्त करत नाही.।।५।।

**केहे सुखराम म्हेर सतगुरु की ।। पेम उमंग घट आवे ।।**
**इण बिध नांव ने:अंछर जागे ।। उलट आद घर जावे ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात हे नाव पराक्रम म्हणजे ने:अक्षर सतगुरुशी प्रेम उपजल्यावर घटामध्ये जागृत होते व ते ने:अक्षर हंसाला घटात बंकनाळेच्या रस्त्याने उलटवून महासुखाच्या सतस्वरुप आदि घरी घेऊन जाते.।।६।।

२५३
।। पदराग भेरू (प्रभाती) ।।

**ओ कोई अरथ बतावे साधो**
**ओ कोई अरथ बतावे साधो ।। ओ कोई अरथ बतावे ।।**
**जिण बिध सूं ने:अंछर प्रगटे ।। सो किमत गेहे लावे ।।टेर।।**

जगातील कोणी साधू माझ्या घटात ने:अछर प्रगट होईल हा भेद ही हीकमत दाखवेल का?।।टेर।।

**ध्यान सकळ साझन कर देख्या ।। नाँव न पायो कोई ।।**
**अनहद जोत ऊजाळा देख्या ।। हिरां की बिरषा होई ।।१।।**

मी ब्रम्हा,विष्णु,महेश,शक्ती आदींची सर्व प्रकारची ध्यान साधना केली परंतु माझ्यात ने: अंछर नाव प्रगटले नाही.मी घटात अनहद ध्वनी ऐकली,ज्योत पाहीली,ज्योतीचा प्रकाश बघितला,हिऱ्यांची वर्षा बघितली परंतु या सर्व विध्यांनी माझ्या घटात नाम प्रगट झालेले दिसले नाही .।।१।।

**सब ध्रम छोड राम हम रटीयो ।। नाँव कळा नही जागी ।।**
**सतगुरू जाय किया हम अेसा ।। सुरत गिगन ज्यॉरी लागी ।।२।।**

सर्व धर्माचे त्यागन करुन ज्या सतगुरुंची सुरत गगनात लागली आहे.अश्या सतगुरुंच्या शरणात गेलो व त्यांच्या आदेशानुसार राम राम रटले परंतु माझ्या घटात नाम कला थोडी सुध्दा प्रगटली नाही.।।२।।

**बाणी अणभे कथ हम देखी ।। सिष साखाँ कर लिया ।।**
**वाँ निज नाव कळा नही जागी ।। धरम बोहोत हम किया ।।३।।**

त्रिगुणी मायेच्या साधनेने उपजलेली वाणी सांगीतली,पर्चे चमत्कारांचे अनुभव घेतले,

शिष्य जोडले,शिष्यांच्या वर शिष्य जोडून शिष्यांच्या शाखा बनविल्या अनेक धर्म केले परंतु घटात निजनाम जागृत झाले नाही.।।३।।

तन मन धन गुरू देवजी कूं दिया ।। कुळ तज सरणे आयो ।।
ग्यान अरथ भेद सब सुज्या ।। ने:अंछर हम नही पायो ।।४।।

मी तन,मन,धन गुरुदेवजींना अर्पण केले कुळाचा त्याग करुन बैरागी बनलो.वेदाचे, शास्त्रांचे,पुराणांचे संतांचे पर्चे चमत्कारांचे भेद जाणले.तरीही मला ने:अक्षर मिळाले नाही.।।४।।

के सुखराम नांव ज्याँ प्रगटे ।। जिण जन कूं जस होई ।।
आप जुगे जुग चडीया गढ पर ।। वे हंस त्यारे सोई ।।५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की शिष्याच्या घटात निजनाम तर त्या सतगुरुंच्या कृपेने प्रगटते जे युगान युगापासून बंकनाळने उलटून ब्रम्हांडाच्या गडावर चढून गेले आहे.(चढून बसले आहे)असे संत हंसाला तारतात अश्या संतांनाच हंस तारण्याचा यश म्हणजे ओहदा राहतो.अन्य मायेच्या कोणात्याही साधु जवळ तो कसाही करामती असला तरी ही त्याच्याने जीव तरत नाही.।।५।।

३७५

।। पदराग जोग धनाश्री ।।

सतगुरां सा कोई सेण न देख्या

सतगुरू सा कोई सेण न देख्या ।। ना कोई ईण सम दाता बे ।।
तीन लोक फिर सब हम देख्या ।। गुरू बिन दोजग जाता बे ।।टेर।।

मी सतगुरु सारखे तीन लोक चवदा भवना मध्ये मला काळाचा महादु:खातून काढून सतस्वरुपाचा महासुखात पाठविण्याचा माझे हित ठेवणारा दाता,सज्जन,हितचिंतक कोणीच नाही दिसला.मला सतगुरु दाता नाही भेटले असते,तर मी दु:खाने व्यापीत नर्काचा महादु:खात पडलो असतो. ।टेर।

जम सरीसा बेरी पाल्या ।। दान भक्त पद दीया बे ।।
बिष की गागर फोड़ज डारी ।। कुँपां अमीरस पाया बे ।।१।।

ज्या वैरी यमाने मला दु:ख देण्याकरीता घेरुन घेतले आहे,त्या यमाला माझा सतगुरुंनी मला दु:ख देण्यापासून रोकून घेतले आणि मला या यमा पासून निघण्याची भक्ति दान केली.मी विषय वासनाचा कारणाने यमाचा हातात परत परत विकला जात होता. त्या विषाची माझी घागर ही फोडून टाकली आणि महासुख देणारे सतशब्दाचे अमृताचा विहीरीचा विहीरी सुखाचा रस पिण्याकरीता दान दिले. ।।१।।

गुंगे कूं मुज मुख बोलायो ।। नेण अनंत खुल आया बे ।।
पंगे कूं गुरू पावज दीया ।। हर कर बोहुत बणाया बे ।।२।।

मी विषय वासनाचा कारणाने मुका होवून गेला होता,आंधळा होवून गेला होता,पांगळा होवून गेला होता,हाताने लुला होवून गेला होता परंतु सतगुरु ने मला सतशब्दाचे सुख देऊन माझा मुखाने मोक्षाचे ज्ञान बोलवुन घेतले,ज्ञानाची अनंत दिव्य डोळे देवून मोक्ष दिसता केला,ज्ञानाचा पाय देवून मोक्षाचा सुखाचा रस्त्याने चालता केला आणि ज्ञानाचे अनेक हात देवून सतगुरुची सेवा करण्या करीता केला. ।।२।।

**मेटी ही रेण तिमर सब भाँज्या ।। उदे सूर घट कीया बे ।।**
**के सुखराम बिरम का चेरा ।। सब अंग सुध कर लीया बे ।।३।।**

सतगुरु ने माझी वासनाची अंधारी रात्र मिटवून माझात सतस्वरुपाचा वैराग्य ज्ञानरुपी सूर्य उगवून दिला.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मी बिरमदासजी महाराजांचा चेला आहे.त्यांनी माझा विषय वासनाचे सर्व अपवित्र स्वभाव मिटवून दिले आणि माझात सतस्वरुपाचे सर्व पवित्र लक्षण प्रगट करुन दिले. ।।३।।

३७६
।। पदराग केदारा ।।

**सतगुरां ओषद पाई ल्याय**

**सतगुरा ओषद पाई ल्याय ।। चोरासी का रोग भागा ।।**
**मिल्या ब्रम्ह सुं जाय ।। सतगुरां ओषद पाई ल्याय ।।टेर।।**

मला मोह मायेच्या कारणाने अनंत युगांपासुन चौऱ्यांशी लक्ष योनीमध्ये जन्मणे व मरण्याचा चिकट रोग लागुन गेला.मी ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती इत्यादी देवताच्या करण्या,क्रियाच्या अनेक औषधी घेतल्या परंतु माझा चौऱ्यांशी लक्ष योनीमध्ये जन्मणे मरण्याचा रोग लेशभर ही कमी झाला नाही.हा माझा जन्म–मरण्याचा रोग सतगुरु ने वैराग्य विज्ञानाची औषधी बनवून दिली ती औषधी पिताच रोग मुळापासुन नष्ट झाला आणि मी कर्मां पासुन मनापासुन व पाच आत्मांपासुन निरोगी होऊन ब्रम्हमध्ये मिळुन गेलो.।।टेर।।

**अनंत बाजा बाजण लागा ।। अनंत ऊगा सूर ।।**
**अनंत इन्दर बरसण आया ।। नदीयां चाली पूर ।।१।।**

वैराग्य विज्ञान औषधाने माझ्या घटात अनंत वाजे वाजायला लागले व अनंत सुर्य उगून गेले,अनंत इंद्र बरसू लागले व नद्या पुराने वाहू लागली.।।१।।

**द्वादस कँवळा दरसें मोने ।। चहुँ दिस चमके बीज ।।**
**रूम रूम मे दिपग जूडियाँ ।। ऐसी कुदरत चीज ।।२।।**

माझ्या घटात मला बारा कमळ दिसू लागले माझ्या घटात चारही दिशामध्ये विजा चमकू लागल्या.माझ्या रोमारोमात दिवे लागून गेले अशी कुदरतची वस्तु माझ्या घटात प्रगटली. ।।२।।

**पीवत पीवत मनवो मेरो ।। रयो हे दिवानो होय ।।**

तीन लोग मुख आगे दीसे ।। ज्युँ अंजळी जळ जोय ।।३।।

ही औषधी पिता पिता माझे मन आनंद पदामध्ये दिवाने होऊन गेले.(वेडे होऊन गेले) मला माझ्या नजरेत तीन लोक चौदा भवन जसे ओंजळीत पाणी दिसते तसे सुक्ष्म दिसू लागले. ।।३।।

आ ओषद तो आपीज करता ।। जाणे हे पीवण हार ।।
कह सुखदेव कोई ओर न जाणे ।। कोहो मुख सूं सेंसार ।।४।।

हे औषध तर फक्त सतगुरु आपणच करु शकले हे मी जाणतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ही औषधी बनविणे आणखी कोणी जाणत नाही.तोंडाने हे औषधी बनविणे जाणतात असे जगाचे ज्ञानी,ध्यानी सांगतात परंतु कोणीही बनविणे जाणत नाही. ।।४।।

३७७
।। पदराग जोगारंभी ।।

## सतगुरू भेव बताविया

सतगुरू भेव बताविया ।। सत्त ग्यान सुणाया ।।
मूरख मन चेताविया ।। के सूता सरप जगाया ।।टेर।।

मला सतगुरुंनी सतज्ञान समजावून महासुखाचा देश प्राप्त करण्याचा भेद सांगीतला जसे साप झोपलेला असतो तेंव्हा त्याला जगाचे लोक धोखा देउन काठीने,दगडाने मारुन-मारुन अर्धमेला करुन टाकतात व मरत नाही तोपर्यंत काठीने,भाल्याने तोंड ठेचतात.तोच साप धोखा होण्याआधी,झोपेतून जागे होऊन गेला असतां त्याला घाबरत राहील्याने जगाचे लोक धोखा करु शकत नाही व मारु शकत नव्हते.याच प्रकारे माझे जड मन,जड जीव माया मोहात तसेच भोग वासनेच्या झोपेत झोपलेला असल्याने युगानयुगापासून सहन न होणाऱ्या काळाचा मार खात होता.सतगुरुचे सतज्ञान ऐकल्याने माझे जड मन चेतन झाले आणि मला माया मोह आणि भोग वासनांमध्ये काळ कसा बसला आहे ही समझ आल्याने मी मोह माया व भोग वासना त्यागुन दिली व मनात सतभेद धारण करुन स्वत:वर पडणारा यमाचा मार संपवून दिला.।।टेर।।

लोभ नदी भारी बहे ।। जुग गाँव बुहाया ।।
जुग जुग मे नर ऊबऱ्या ।। गुरू सरणे आया ।।१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,युगांनुयुगांपासून मनुष्य जीवनाच्या रस्त्यात मधोमध लोभाची भारी नदी वाहून राहीली आहे.तीच्या प्रवाहात(मंझधार) जगाचे सर्व गावचे गाव वाहून राहीले आहे व त्या प्रवाहात दु:ख भोगत बुडून-बुडून हाल होउन मरुन राहीले आहे.जे मनुष्य सतगुरुच्या शरणात आले आहे तेच या लोभ रुपी नदीत वाहून जाण्यापासून वाचले आहे व वाचत आहे.।।१।।

अब जाग्रत चेतन भया ।। जुग दुख दिखलाया ।।
सब जुग बेंता जोय के ।। मेरे डर आया ।।२।।

सतगुरुंनी मला जगातील नर–नारीवर(स्त्री–पुरुष)पडणारे छोट्या पासून मोठे काळाचे महादु:ख ज्ञानाने समजाउन समजाउन सांगीतले हे सहन न होणारे दु:ख ऐकून माझे मन जागृत म्हणजे चेतन झाले.जसे जगाचे लोक भयभीत झाल्यावर घाबरुन बेचैन होतात व रात्र–दिवस त्या भीतीने झोपू शकत नाही.त्याचप्रमाणे काम,कोध,लोभ नदीत वाहून गेल्याने होणारे यमाचे दु:ख ऐकून माझ्या मनात ही भीती आली.।।२।।

रात दिन सोवे नही ।। जम काडर खाया ।।
जन सुखदेव लव लीन हुवा ।।गुरू भेव बताया ।।३।।

त्या यमाची भीती मला रात्रं–दिवस खाऊ लागली.ज्यामुळे मी रात्र–दिवस झोपू शकत नव्हतो.जेंव्हा सतगुरुंनी काम,कोध,लोभरुपी नदीतून निघण्याचा भेद दाखविला,तेंव्हा माझी भीती दूर झाली व मी सतगुरुंच्या सतभेदात लवलीन झालो.यमाच्या महादु:खा–तून निघून सतगुरुंच्या महासुखाच्या परमदेशात पोहचलो.तेव्हा मी रात्रदिवसा(रात्री व दिवसा)झोपू लागलो.।।३।।

३७९

।। पदराग केदारा ।।

सत्गुरू तारेगा मुज आण
बिसवा बीस इकीस ऊपर ।। ओर हजारा जाण ।।टेर।।

मला माझे सतगुरु या महादु:खाच्या महासागरातून तारतील शंभर टक्के नाही एकशे एक टक्का तारतील.एकशे एक नाही एक हजार टक्के तारतील.।।टेर।।

गोत हमारे रामसनेही ।। संगत सेण बखाण ।।
गेलो निज पंथ ग्यान उजागर ।। पवन गजले ढाण ।।१।।

रामस्नेही हा माझ कुटूंब परिवार आहे.सर्व सतसंगी माझे हितैषी(सज्जन)आहे.म्हणजे मी भवसागरातून पार होईल.हे माझे सुख चाहनेवाले आहे.सतगुरुंच्या ज्ञान दयेने माझ्यासाठी निजदेशास जाण्याचा श्वास मार्गाचा रस्ता उजागर म्हणजे मोकळा करुन दिला आहे.अश्या रस्त्याने मी हत्तीची चाल चालतो.।।१।।

पेम हमारे परमसनेही ।। सोऊँ भाव पिछाण ।।
सुरत हमारी आद सरीरी ।। भेद गेहे तत्त छाण ।।२।।

सतगुरुंशी प्रेम तसेच भाव हे माझे परमस्नेही आहेत.निजदेश पोहचविणारी माझी सुरत ही माझी आद शरीरी म्हणजे पत्नी आहे.ही सुरता पत्नी तत्तचा विचार करुन परमतत्तचा भेद घेते.।।२।।

ग्यान बिग्यान बिचार बिधरे ।। मत मेहमत तत्त छाण ।।

जन सुखराम भाग सुं पावे ।। या बिध सतगुरू जाण ।।३।।

याप्रकारे भवसागरातून तिरण्याचे सतविज्ञानाच्या विध्यांच्या मतातून माझे मत वैराग्य तत्त सार छाणते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.सार काढण्याची विधी व सतगुरु प्राप्त करण्याची विधी पूर्वीच्या भाग्याने प्रगट होते.।।३।।

३९६

।। पदराग गुड ।।

### प्रस्तावना

आदि सतगुरु सुखरामजी महाराज या पदात हे सांगतात कि,सतगुरु मला महादु:खाचा भवसागरातून तारतील ही तारतील.सतगुरु ही जीवांना तारतात या विश्वासावर हे पद आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी कथले आहे.

तारेगा ते: तीक

तारेगा ते: तीक ।। सतगुरू तारेगा ।।

ईण भवसागर के मांय ।। पार उतारेगा ।।टेर।।

सतगुरु मला लवकरच,निश्चितही तारतील.या भवसागरातून तारुन पार उतारतील. ।।टेर।।

मोय भरोसो बिड़द को हो ।। सुण लिज्यो सब लोय ।।

सतगुरू सरणे नर आयकर हो ।। डूबो सुण्यो हन कोय ।।१।।

मला सत्‌गुरुच्या ब्रिदाचा पक्का भरोसा आहे.हे जगाचे सर्वही लोक ऐकून घ्या.सत्‌गुरुच्या शरणात आलेला कोणीही मनुष्य आज दिवस पर्यंत कोणी बुडालेला आहे असे मी आज दिवस पर्यंत कोणीही ऐकले नाही. ।।१।।

असंख जुगां मे अनंत साधू ।। दे गया अणभे हाक ।।

सतगुरां के संग अवस तिरसी ।। भरत गीता साख ।।२।।

असंख्य युगापासून अनंत साधू सत्‌गुरुच्या भरोसे तिरले ही तिरले.या अनुभव घेतलेली गोष्ट हाक मारुन सांगून गेले आणि गीतेत कृष्णा ने पण सत्‌गुरुच्या बरोबर तरतो ही पक्की साक्ष दिली आहे,।।२।।

इस्तू आगे फूस केता ।। जळ आगे क्या आग ।।

यूं नांव आगे करम हमारा ।। जाय इसी बिधी भाग ।।३।।

जसे अग्नीचा पुढे कचरा जळून राख होवून जातो,जळाचा पुढे आग शांत होवून जाते. या प्रकारे सतगुरुंनी दिलेले नामाचा बळाने सर्व कर्म पळून जातात.।।३।।

ओ मन मेरो किरीयो हो ।। नांव नवका होय ।।

सतगुरू सुंज बणाय सारी ।। पार कियो हे मोय ।।४।।

हे माझे निजमन हे किरीया आहे म्हणजे नाव चालविणारा आहे आणि सतगुरु ने दिलेले

नाम माझासाठी भवसागरातून पार होण्याकरीता नौका आहे.असे नाम नौकात मला बसवून सतगुरु ने भवसागरातून पार होण्याची सुंज म्हणजे व्यवस्था बनवली आणि मला पार करुन दिले.।।४।।

**सूर पिछम दिस ऊगवे हो ।। गंग ऊलट फिर जाय ।।**
**तोई सत्तगुर तारसी हो ।। मोय भरोसो मांय ।।५।।**

एक वेळ सूर्य पूर्वचा ऐवजी पश्चिम दिशा ने उगवू शकतो आणि गंगा खालचा बाजूला न वाहता उलटून वरचा पहाडाकडे वाहू शकेल,परंतु काहीही झाले तरी पण सतगुरु नाही तारणार हे नाही होवू शकत.या करीता सतगुरु तारतील ही तारतील हे मला पक्का भरोसा आहे. ।।५।।

**जन सुखदेव कहे सांभळो हो ।। सतगुरू सरणे आय ।।**
**पेदा करंदो रूठीयो हो ।। तोई नरक न जाय ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,संसाराचे सर्व नर–नारीनो ऐका,सतगुरुचा शरणात आल्याने जीव तरतो ही तरतो.असे शरणात आलेले जीवावर पैदा करंदा सतस्वरुप परमात्मा स्वयम् पण जाती ने रुसला तरी पण जीव नरकात न जाता भवसागरातून तरतो ही तरतो,हे सर्व नर–नारीनो तुम्ही याची हृदयात गाठ बांधून घ्या. ।।६।।

४१६
।। पदराग भेरू (प्रभाती) ।।

**वा बिध सबसुं न्यारी वो**
**वा कुद्रत कळा नियारी वो ।। वां ने:अंछर बिध न्यारी वो ।।**
**जो पावे सो मोख पहुँचे ।। ओर सकळ की खुवारी वो ।।टेर।।**

ही कुद्रतकला होणकाळच्या सर्व कलांहुन वेगळी आहे.ही कुद्रतकला प्राप्त केल्याने जीवाला मोक्ष प्राप्त होतो व अन्य होणकाळाने बनविलेल्या मायावी कलांमध्ये रमल्याने जीवाला होणकाळ खातो.त्या कारणाने जीवांची खुप खराबी होते.।।टेर।।

**झूट झूट आधीनपणो रे ।। झूट गरीबी होई ।।**
**झूट झूट सो सीळ जत्तरे ।। या मे मोख कोई ।।१।।**

मगरुरीत व अहमपणात न राहता अधिनपणात राहिल्याने मोक्ष होत नाही.कारण अधीन–पणात कुद्रतकला नाही.असेच गरीबी स्वभाव प्रगट करणे,शिल ठेवणे,जती बनून राहणे या स्वभावामध्ये कुद्रतकळा नाही म्हणून मोक्ष नाही.हे सर्व अधीनपण,गरीबी, शिल,जत,मायेच्या क्रिया मोक्ष प्राप्त करुन देण्याकरिता खोट्या आहेत.कोणी ज्ञानी, ध्यानी समजतात की मी अधीनपणाने,गरीबीने,शिलने,जतने मोक्ष प्राप्त करुन घेईल व मला मोक्ष प्राप्त करण्याकरीता कुद्रतकळेची गरज नाही तर ही समज मोक्षाकरीता खोटी आहे.।।१।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**जरणा समज सरम सो झूटी ।। झूटी सब चतुराई ।।**
**अंग नाँव सबही सुण झूटा ।। ता मे मोख न काई ।।२।।**

जरणा म्हणजे सहनशीलता ठेवणे,त्रिगुणी मायेच्या ज्ञानाची समज ठेवणे,निच विषय रसांमध्ये न जाण्याची शरम ठेवणे,सर्व शुभ शुभ क्रिया करण्याची सर्व चतुराई ठेवणे इत्यादी जसे सर्व चौसष्टचे चौसष्ट मायेचे शुभ लक्षण प्रगट करणे हे मोक्ष प्राप्त करण्याकरीता खोटे आहेत.या मायेचा कोणत्याही लक्षणात कुद्रतकला नाही म्हणून या अंग लक्षणाने कोणाचाही मोक्ष होत नाही.।।२।।

**भेक बिध कूंची सब झूटी ।। झूटा बन का जाणा ।।**
**झूट ब्रम्ह अेक कर जाण्यो ।। झूटा सब मिल खाणा ।।३।।**

षटदर्शनाचे वेश धारण करुन साधू बणणे,योगाची किल्ली जाणणे,त्यागी बनून वनात जाणे,सर्वांमध्ये एकच ब्रम्ह जाणून सोबत जेवणाला बसून एकमेकांचे उष्टे खाणे या सर्व विध्यांनी मोक्ष होत नाही म्हणून या सर्व विध्या मोक्ष प्राप्त करण्याकरीता खोट्या आहेत. ।।३।।

**मून चुपक क्रिया सब झूटी ।। झूट दया दुःख भाई ।।**
**केणी सुणणी सब ही झुटी ।। यामे मोख न काई ।।४।।**

चूप राहून मौन धारण करणे,हत्तीपासून ते मुंगीपर्यंतच्या प्राण्यांचे दुःख पाहताच घटात दया प्रगटणे,वेद,शास्त्रचे ज्ञान सांगणे,ऐकणे हे सर्व मोक्ष प्राप्त करण्याकरीता खोटे आहेत.या विध्यांनी मोक्ष मिळत नाही.।।४।।

**कथणी झूट अरथ सो झूटा ।। मुख सूं के सो बाई ।।**
**मस्ती लाय भ्रम तज बेठा ।। से झूट जग मांई ।।५।।**

वेद,शास्त्रची कथनी करणे,अर्थ करणे,बोंडाने वेदाची कोणतीही साखी,श्लोक बिना पाहिल्याने कंठस्थ सांगणे,मस्त होवून काळाच्या भयाचे भ्रम त्यागून राहतो हे सर्व लक्षण मोक्ष प्राप्त करण्याकरीता खोटे आहेत.।।५।।

**सुभ अंग झूट असुभ ही झूटा ।। जाँ सूं मुक्ति न जावे ।।**
**पूंथो गुरू प्रेम सो साचो ।। घट मे नाँव जगावे ।।६।।**

मायेचे सर्व चांगले व वाईट स्वभाव सतस्वरुप मुक्ती प्राप्त करण्याकरीता खोटे आहेत. या कोणत्याही लक्षणांमध्ये सतस्वरुप मुक्ती नाही.जेव्हा प्राण्याला सतस्वरुपात पोहचलेले गुरु मिळतात व त्या गुरुपासुन जीवाला निजमनाने प्रेम उपजते तेव्हा घटात नेःअक्षर नाम जागृत होते हे सोडून अन्य कोणत्या मायावी क्रियेने मोक्ष होत नाही उलट काळाच्या दुःखात पडण्याची खराबी होते.।।६।।

**के सुखराम बस्त वा पायाँ ।। पीछे कारण नाँही ।।**

भावे जिसा कोइ अंग व्हो जनमें ।। सब आछा जुग मांही ।।७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,घटात निजनाम वस्तू प्रगट झाल्या नंतर कोणतेही लक्षण प्राप्त करण्याचे कारण नाही हे सर्व चौसष्टचे चौसष्ट शुभ लक्षण कुद्रती प्राप्त होऊन जातात.संतामध्ये कुद्रतकळा प्राप्त होऊन गेली व त्याचे अंग निच आहे तरीही मोक्षात जाण्यापासून त्याचे थांबत नाही.नेःअक्षरच्या प्रतापाने मागे पुढे कुद्रतीच संताचे सर्व नीच अंग उंच होऊन जातात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले.।।७।।

१६

।। पदराग केदारा ।।

ऐसो कोई ताप बुझावे आय ।।

अधपे मेरी पीड़ मेटे ।। सो गुरू में सिष थाय ।।टेर।।

जगात असे कोणी गुरु आहेत का जे माझी तपन(ताप)मिटवून देतील.माझी पीडा मिटवून देतील असा कोणी गुरु आहेत का?असा कोणी गुरु असतील तर त्यांना मी माझे गुरु बनवेल व मी त्यांचा शिष्य बनेल.।।टेर।।

आग बिना सुण प्राण दाझे ।। सि बिन देहे थरराय ।।

बिष बिन लेहर भाँग बिन पीयां ।। प्राण गिगन दिस जाय ।।१।।

माझा अग्नी विना प्राण जळून राहीला आहे व विना थंडीने शरीर थरथरुन राहीले आहे. भांग न पिता भांगची लहरे शरीरात उत्पन्न होत आहे व माझा प्राण गगणाच्या दिशेने जाऊन राहीला आहे.।।१।।

बिन समसेर तीर बिन बरछी ।। मन बिंधाणो आय ।।

डर बिन डरूं बी बिना बिरह ।। बोहोत ऊप ज्यो माय ।।२।।

तलवार विना,तिर विना,बरछी विना माझ्या मनाला छेद पडून राहीले आहे.मला कोणी ही भिववित नाही परंतु मी भीत आहे.मला विना कारण विरह उपजत आहे ही भीती व विरह खूप उपजत आहे.।।२।।

में बिन पाणी बुवा जाऊँ ।। जे कोई काढे आय ।।

के सुखदेव गरू सो मेरा ।। चरणा रहूं लपटाय ।।३।।

पुर तर नाही परंतु पुरासारखेच वाहून जात आहे मला या सर्व तापापासून कोणी मुक्त करेल का?आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की अश्या माझ्या गुरुंच्या चरणात मी राहू इच्छीतो.।।३।।

१५३

।। पदराग मस्त ।।

हे तूं तो बाबल मुज परणावो हो ।।

आतम का हो बापजी ।। हे तूं तो बाबल मुज परणावो हो ।।टेर।।

आत्मा ही कन्या आणि बाप(सतगुरु)सतगुरु,बापाशी ही कन्या सांगते की,हे पिता माझे लग्न करुन दे.आत्म्याचा बाप,माझे लग्न करुन दे.।।टेर।।

**आतम किन्या बचन उचारा ।। अब मुज पीर लगे जुग खारा ।।**
**बिन खावंद सो ध्रक जमारा ।। हो तूं तो बाबल मुज परणावो हो ।।१।।**

आत्मा कन्या वचन बोलली की,आता मला माहेर आणि हा संसार कडू लागतो.आत्मा म्हणते आहे नवरदेवा शिवाय माझे संसारात राहणे धिक्कार आहे.अहो पिता आता माझे लग्न करुन द्या. ।।१।।

**अब मुज समज बोहोत ऊर आई ।। बिना खावंद किम जीऊंरी माई ।।**
**सतगुरू पास अकल बोहो पाई ।। अब मेरो अेळ जमारो जाय हो ।।२।।**

आता माझ्या हृदयात पुष्कळशी समज येऊन आली.नवरदेवा शिवाय मी जिवंत कशी राहू?सतगुरुकडून मला नवरदेवा विषयी खुपच अक्कल मिळाली.आता माझे हे आयुष्य व्यर्थ जाऊन राहीले आहे. ।।२।।

**मेरी साईया के लड़का होई ।। बागा हे थाळ अनाहद सोई ।।**
**अणंभे गुळ बटीजे लोई ।। हो अेतो सेज समाध समावे हो ।।३।।**

माझ्या बरोबरीच्या मुलींना मुले होऊन गेले.त्यांच्या अनहदचा थाळ्या वाजुन गेल्या.(मुलगा जन्म घेतो तेंव्हा काशाची थाळी वाजवतात.त्याप्रकारे अनहदची थाळी वाजून गेली.)आणि अनुभवाचा गुळ लोकांमध्ये वाटून राहिला आहे.दुसरे माझ्या बरोबरीचे संत आपण घेतलेल्या अनुभवाचे ज्ञान लोकांना वाटून राहिले आहे म्हणजे सांगुन राहिले आहे. अहो,हे दुसरे तर सहज समाधीमध्ये सामावून राहिले आहे. ।।३।।

**केहे सुखराम ब्याव अब कीजे ।। के मेरो दोस सराप सहीजे ।।**
**गुण ओगण सब छाड़ दे दीजे ।। अब तूं तो बेगो लगन लिखाय हो ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की,आत्मकन्या सतगुरु बापाला बोलली की, आता माझे लग्न कर,लग्न करत नाही तर,माझा दोषांच्या बदले माझा श्राप सहन कर. माझे गुण आणि अवगुण सर्व सोडून दे.आता तू तर माझे लग्न लवकर ब्राम्हणा जवळून लिहून घे. ।।४।।

२१०

।। पदराग भेरू (प्रभाती) ।।

## क्या मै करूँ उपाई

**क्या मै करूँ उपाई ओ संतो ।। क्या मे करूँ उपाई ।।**
**बंक नाळ होय ऊलटा चडीया हुँ ।। तोई मुज धिर न आई ।।टेर।।**

संत मी बंकनाळाच्या रस्त्याने उलटून त्रिगुटीत चढून गेलो तरीही माझ्या मनाची उदासी जात नाही आता मी काय उपाय करु?ज्याच्याने माझ्या मनाला धीर येईल. ।।टेर।।

तिस हजार कथी हम बाणी ।। ध्यान त्रकुटी लागो ।।
ओजूं मन में लेरां ऊटे ।। भरम सकळ नही भागो ।।१।।

मी तीस हजार श्लोक वाणी सांगीतली आहे मी त्रिगुटी पोहचून गेलो तरीही माझ्या मनात काळाच्या परेचा(पलिकड्चा)मुलूक मिळेल की नाही याची राहून राहून शंका निर्माण होत आहे व नेहमी नेहमी भ्रम उत्पन्न होत आहे माझ भ्रम पूर्णपणे जात नाही आहे.।।१।।

ऊझड़ पेंडा मित्याहन मेरा ।। दाय कछु नही आवे ।।
चेंला ग्यान गिरहे अर त्यागी ।। अेको मन नही भावे ।।२।।

उजाड म्हणजे ठीकाणावर न पोहचणाऱ्या रस्त्याने चालणे माझे आताही सुटले नाही. मला वेद,शास्त्र,पुराण इ.मायेच्या ज्ञानाच्या गोष्टी आवडत नाही.गुरु बनून शिष्य बनविणे व त्याला ज्ञान सांगणे,गृहस्थ बनून कुटुंब परिवाराचे सुख घेणे किंवा स्त्री–पुरुष,धन–संपदा त्यागून त्यागी बनने यातील एक ही गोष्ट माझ्या मनाला आवडत नाही.।।२।।

सांख जोग और नौद्या भक्ति ।। अेको मन नही धिजे ।।
सेंस भुजा धर साहेब आवे ।। तोइ मेरो मन नही रिजे ।।३।।

ब्रम्हाचा सांख्ययोग,शंकराचा हटयोग,विष्णुची नवविद्या भक्ती यापैकी एकानेही माझे मन खुशी होण्यास तयार नाही.इतकेच काय की साहेब हजार भुजां धारण करुन माझ्या समोर उभे राहीले तरी ही माझे मन खुश होण्यास तयार नाही.।।३।।

जंतर मंतर बेद पुराणा ।। पढ पढ सब तच काया ।।
ओऊँ जाप अजपो कहिये ।। ये मुज दाय न आया ।। ४ ।।

जगात पर्चे चमत्कार करणारे जंतर,मंतर,चार वेद,अठरा पुराण शिकून शिकून व तशी क्रिया करुन करुन पर्चे प्राप्त केले परंतु त्या पर्चांनी माझे मन जरासेही खुश झाले नाही.यामुळे मी त्या सर्व वस्तूंचा त्याग केला.ओअम,अजप्पाचा जप करुन संकनाळने भृगुटीत घर केले तरीही माझे मन उदासच राहीले या कारणाने मला भृगुटीचे घर राहण्याकरीता जराही पसंत नाही.।।४।।

के सुखराम अेक मोय सूझे ।। कोइ देस मुलक म्हारो आगो ।।
ईण कारण आ बिरह ऊदासी ।। ध्यानज म्हाने लागो ।।५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की माझा देश म्हणजे मुलुक त्रिगुटी मुलकापेक्षा वेगळा आहे व तो मला आता पर्यत मिळाला नाही ही कुद्रती समझ मला आल्या कारणाने मला बिरही म्हणजे उदासी आहे.ही समझ येत आहे.।।५।।

२३४

।। पदराग बसन्त ।।

मेरे लागी हो उर शबद भाल

मेरे लागी हो उर शबद भाल ।। क्या करिये हो जुग क्रित ख्याल ।।टेर।।

माझ्या हृदयात माझ्या गुरुंचे ज्ञान शब्दाचे तीर लागले आहे.आता माझ्या मनाला संसाराचा कृत्रिम सुखाचा खेळ आवडत नाही.तो खोटा वाटतो.।।टेर।।

**जे मन घेर राखूं उर माँही ।। तो तन टूक टूक होय जाय ।।**
**मेरे बस नहिं ओ मन ।। होय ब्रम्ह धाहाँ पुकारे जोय ।।१।।**

मी माझ्या मनाला घेरुन घेरुन संसारात लावतो.तरी ही ते संसारात जराही रमत नाही. माझ्या शरीराला संसारात लावतो तर माझ्या मनाचे तुकडे–तुकडे होतात म्हणजे शरीरास सहन न होणारे कष्ट पडतात.याप्रकारे माझे मन व तन माझ्या वश राहत नाही.माझा विरह रामजी करीता जोरात ओरडतो ?।।१।।

**अकबक जीव भयो मन मोय ।। जुग कुल लाज न आवे कोय ।।**
**रूम रूम कहे राम राम ।। कब हर परसुं निजधाम ।।२।।**

माझा जीव व मन रामजी प्राप्त करण्याकरीता बेभान होउन गेले.त्याला कुळाची,जगाची काहीच लाज शर्म राहीली नाही.माझ्या जीवास व मनाला कुळ व जगाची कोणतीच मोह ममता राहीली नाही माझे रोम रोम राम राम म्हणते व मी केंव्हा निजधाम पोहचेल याचीच नेहमी फिकीर(काळजी)करतो.।।२।।

**जुग मे सेण न दिसे कोय ।। सब नर नारी जमा सम होय ।।**
**के सुखराम गुरू धिन क्काय ।। के रामस्नेही जे जुग माँय ।।३।।**

पूर्ण संसारात माझी भलाई करणारा सतगुरु व रामस्नेही शिवाय कोणी सज्जन दिसत नाही.जगाच्या कुळापासून सर्व नर–नारी यमासारखे दिसू लागतात.जसे यम जीवाला होणकाळ त्यागू देत नाही.होणकाळात मोह ममतेच्या चक्रात लावून होणकाळातच अटकवून ठेवतो तसेच माझे कुल परीवार व जगाचे लोक निजधामास जाऊ देत नाहीत.मोह,ममता करुन होणकाळातच ठेवणे चाहतात.परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की,माझे सतगुरु व माझे रामस्नेही मी होणकाळ त्यागून निजधामास जावे ही इच्छा ठेवतात म्हणूनच माझे सतगुरु व सर्व रामस्नेही धन्य आहे,धन्य आहे. ।।३।।

२३६
।। पदराग धमाल ।।

**मेरे प्रितम प्यारे कब मिले हो**
**मेरे प्रीतम प्यारे कब मिले हो ।। जे मेरा धुर खावंद हे वो सोय ।।टेर।।**

माझे प्रितम(प्राण प्रिय)प्रिय आपण मला केंव्हा भेटणार?माझे आदिचे जे माझे पती आहे ते मला केव्हा भेटतील? ।।टेर।।

**प्रित पुकार पुकार पुकारे ।। ब्रहन रही बिल लाय ।।**
**रात दिवस कळ ना पडे. हो ।। उडत पांख बिन जाय ।।१।।**

त्यांच्याशीच प्रीती लागली आहे.ती प्रीती बोलावून बोलावून बोलवत आहे आणि विरहीणी

तडफडा करुन रडत आहे.बिलखुन राहीली आहे.रात्र-दिवस चैन पडत नाही.ही तर पंखाच्या शिवाय(बिना पंखाने)उडून उडून मालकाकडे जात आहे.।।१।।

**सुध बुध सबे भूल गई सारी ।। अेक अकल आ मांह ।।**
**रामही राम पुकारे निस दिन ।। अेक पीव की चाह ।।२।।**

सुध बुध सर्व विसरुन गेली.सुध भूलून बेसुध होउन गेली आणि बुध्दी भुलून निबुध्दी होऊन गेली.फक्त ही एक अक्कल राहून गेली आहे की,रात्रं-दिवस राम राम नामाची पुकार करने हीच एक अक्कल राहून गेली आणि एक पीव(मालकाला)रामजीशी मिळण्याची चाहना आत आहे.।।२।।

**अन जळ तजा निंद नहिं आवे ।। सूक रहयो तन ज्योय ।।**
**कहे सुखदेव इण जगत में हो ।। ध्रिग जनम हे मोय ।।३।।**

अन्न-पाणी,खाणे पिणे सोडून दिले व झोपही येत नाही आणि हे सर्व शरीर सुखून राहीले आहे.हे पाहून घ्या.या संसारात माझे जन्म घेणे धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।३।।

२४२
।। पदराग मिश्रित ।।

**म्हारो ने संदेसो साहेब सांभळो ।। बिनाजी सुणीयां रो, नही ये सूल ।।**
**ब्रहन बिचारी तन कूं छाडसी ।। रही ऊरध मुख झूल ।।टेर।।**

आत्मा परमात्माला प्रार्थना करत आहे कि हे परमात्मा,माझा संदेश ऐका.तुम्ही नाही ऐकणार तर माझे दु:ख कसे मिटेल.बिरहन सांगते की,माझे दु:ख तुम्ही नाही ऐकले,तर मी शरीर त्यागुन देईन.मी उलट्या मुखाने झुलुन राहीली आहे.।।टेर।।।

**बरस अठारा हर बिना काडीया ।। म्हारे आस रही घर माय ।।**
**अब तो जोगण हर होय जाव सूं ।। बस्तर देऊँजी बगाय ।।१।।**

मी आपल्या प्राप्ती करीता अठरा वर्ष काढले आहे.मायाच्या कर्मात आशा राहीली. आता तर मी हे परमात्मा कर्मापासून वेगळे होवून विज्ञान वैरागी होवून जाईल.बस्तर याने त्रिगुणी मायाचे कर्म त्यागून वैरागी होवून जाईन.।।१।।

**काँयेतो ढोल्यो हर नही घालता ।। भेद न देताजी मोय ।।**
**बीना तो दिटी साहेब चीजरो ।। म्हाने दु:ख दालद नही होय ।।२।।**

हे परमात्मा तुम्ही ढोल्या म्हणजे मनुष्य शरीर दिले नसते आणि सतशब्द कसा प्रगट होतो त्याचा भेद दिला नसता तर बिना पाहीलेल्या वस्तुचा मला दु:ख आणि पश्चाताप झाला नसता.।।२।।

**सबदां कलेजो राम जी बीदियो ।। म्हारे करोत बहे उर माय ।।**
**नख चख साले रामजी निस दिना ।। मो सूं हर बिना रयो नही जाय ।।३।।**

शब्दाने माझा काळीज छेद्‌ले गेले आणि माझा हृदयात करवत चालण्या सारखा वेदना होऊ लागल्या.माझा नखापासून चखापर्यंत रात्रं दिवस ही वेदना होऊन राहीली आहे. माझ्याने परमात्मा शिवाय राहीले जात नाही.ही विरह लागून राहीली आहे की हे परमात्मा तुम्ही मला केंव्हा भेटणार.।।३।।

अब तो जग मे वो हर नही आवड़े ।। आप मिलोनी आय ।।
ईण तो अपराधी दुष्टी जीवरो ।। जलम अकारथ जाय ।।४।।

हे परमात्मा आता मला त्रिगुणी मायाचे सुख चांगले भावत नाही.याकरीता सतस्वरुपी रामजी तुम्ही येऊन मला भेटा.या अपराधी व दृष्ट जीवाचा जन्म आपल्या भेटल्या विना वाया जाऊन राहीला आहे.।।४।।

अेकण मेल दूजे चडी ।। तीजी खड़ी छू जी आण ।।
बजर दरवाजा हर नही ऊघडे ।। रया क्रराजी ताण ।।५।।

एक महल म्हणजे पिण्ड,पिण्डाने दुसरा महल म्हणजे खण्डात मी चढली व तिसऱ्या ब्रम्हण्डा वर येऊन उभी राहीली.परन्तु वज्रपोळचा दरवाजा माझ्याने उघड्त नाही.हा दरवाजा फार मजबूत लावला आहे.।।५।।

चेन तमासा हर दिखलाय के ।। मत डेहकावोजी मोय ।।
किरपा करोनी जन पर दयालजी ।। मोय द्रसण दो पट खोय ।।६।।

हे परमात्मा मायाचे चेन तमाशे सांगून मला बहकावु नका.हे दयालु तुम्ही माझावर कृपा करा व माझे पट खोलून दर्शन द्या.।।६।।

जन सुखदेव हरजी सूं बीणती ।। सुणज्योजी सुरत लगाय ।।
अमर लोक जी साहेब आपरो ।। म्हने बडोजी देखण रो चाव ।।७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले कि,हे परमात्मा,माझी प्रार्थना लक्ष देऊन ऐका. आत्मा सांगून राहीली आहे,मला आपल्या अमरलोकाला पाहण्याची फार इच्छा होऊन राहीली आहे.।।७।।

२७९

।। पदराग गुड ।।

## पिया मै दोरी हो

पिया मै दोरी हो ।। प्रगटो दीन दयाल ।। पिया मै दोरी हो ।।
ओ दिन दुभर जाय ।। पिया मै दोरी हो ।।टेर।।

आत्मा नारी परमात्मा पतीला म्हणते की मालक मी आपल्या शिवाय दु:खी आहे.हे दिनदयाळ आपण प्रगट होऊन मला भेटा.माझे दिवस खूप कठीण व्यतीत होत आहे.मी आपल्या शिवाय खूप दु:खी आहे. ।।टेर।।

**प्रेम लग्यो हर नाम सूं हो ।। मै भूली खानर पान ।।**
**दरस दीज्यो साइयाँ ।। मुज अंतर आतम राम ।।१।।**

मला हरनामाशी प्रेम लागले आहे.या प्रेमामुळे मी खाणे पिणे विसरुन गेली आहे.हे माझ्या आत्म्याचे रामजी आपण मला माझ्या अंतरात दर्शन द्या.।।१।।

**रटत रट खाती भई हो ।। जे बिरह कल राय ।।**
**खिन पल जोऊँ बाटड़ी प्रभू ।। अत प्रगटो आय ।।२।।**

तुमचे नाव रटून रटून तुम्हाला प्राप्त होण्याकरीता उतावळी झाली आहे.माझी विरहन कल राय क्षणा क्षणात पळा पळात आपली वाट पाहून राहीली आहे.तुम्ही लवकर येवून प्रगटा.।।२।।

**तूम बिन सब सुखं झूट हे प्रभू ।। बिरहन नही सुहाय ।।**
**प्राण तजेगी साईयाँ ।। के दर्सण दीज्यो आय ।।३।।**

हे प्रभु,तुमच्या शिवाय विषयांचे सर्व सुख खोटे आहे.हे माझ्या बिरहीणीला म्हणजे आत्म्याला आवडत नाही.आपण दर्शन दिले नाही तर,हे प्रभु मी माझे प्राण त्यागून देईल.।।३।।

**बाट निसोदिन देखता प्रभू ।। दिन दिन निसऱ्या जाय ।।**
**ब्रहन कूं डर ऊपजे प्रभू ।। बोहो ओगण मुज माय ।।४।।**

प्रभुजी,आपली अंतरात वाट पाहता पाहता दिवस व्यतीत होऊन राहीले आहे.तुम्ही मला येऊन भेटत नाही म्हणून मला बिरहीणीला माझ्यामध्ये काही अवगुण आहे का? ही भीती वाटते.।।४।।

**मेरा ओगण पर हरो प्रभू ।। तेरा बिड़द निभाय ।।**
**सरणे आया साईयाँ ।। सो तो अजिया कूं फळ खाय ।।५।।**

माझ्यात जे ही अवगुण असतील ते बघु नका त्यांना न बघितल्यासारखे करा व आपले अवगुणांना माफ करण्याचे ब्रीद निभवा.जसे सिंहाच्या शरणात बकरी गेली होती त्या बकरीस सिंह हत्तीवर बसवून चांगले चांगले नाजुक फळ खाऊ घालत होता.असेच मी ही आपल्या शरणात आली आहे.।।५।।

**आज क कालक साँईयाँ हो ।। भावे मिल जुग माय ।।**
**तन मन सूंप्यो आप कूं प्रभू ।। सतगुरू सरणे जाय ।।६।।**

हे साई आज उद्या मध्येच भेटा किंवा आपणांस जेंव्हा चांगले वाटेल तेंव्हा भेटा. प्रभुजी मी सतगुरुंच्या शरणात जाऊन तुम्हाला माझे तन,मन अर्पण केले आहे.।।६।।

**तुम मिलीया बिन बाहिरो हो ।। ध्रग जनम जुग मांय ।।**
**कंथ बिहुणी सेज मे प्रभू ।। रोवत रेण बिहाय ।।७।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

प्रभुजी,आपण मिळाल्याशिवाय माझे संसारात जन्म घेणे धिक्कार आहे.जसे स्त्रीचे पती शिवाय बिछान्यावर रडून रडून रात्र व्यतीत होते त्याचप्रकारे तुमच्या शिवाय माझी स्थिती झाली आहे.।।७।।

**अंतर गत की पीड़ ने प्रभू ।। किन सुं कहिये सुणाय ।।**
**जन सुखदेवजी बीनवे ।। अब प्रगटो अंतर मांय ।।८।।**

प्रभुजी मी माझ्या आतील दु:ख कोणास सांगु.हे प्रभु आपल्याला विनंती करते की आता आपण बिना विलंब माझ्यात प्रगट व्हा.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात. ।।८।।

२९६
।। पदराग भेरू (प्रभाती) ।।

**राम मिल्या बिन हरजन दुखिया**
**यूँ हि अवसर बीता ।। मन दुखिया बिन प्रीत साधो ।।टेर।।**

घटात रामजी मिळत नाही तो पर्यत हरीचे जन रामजी मिळण्याकरीता दु:खी असतात उदास असतात व आपला वेळ व्यर्थ जात आहे याचे दु:ख करत राहतील.जसे प्रत्येकाचे मन ज्यांच्याशी स्नेह(प्रीती)आहे तो स्नेही(प्रियजन)भेटत नाही तोपर्यंत उदास राहतो तसेच रामजीचे जन रामजीस भेटण्याकरीता उदास राहतात.।।टेर।।

**जळ बिन सब ही बागज दुखिया ।। पच दुखिया बिन फी था ।।**
**नर बिन नारी बोहोत बिड़ाणी ।। रिष दुखिया बिन गीता ।।१।।**

जसे बाग बगीचा पाण्याशिवाय दु:खी होऊन सुकायला लागतात.पति शिवाय पत्नी दु:खी राहते ऋषी ज्ञान ग्रंथाशिवाय दु:ख राहतात तसे हरीजन रामजी शिवाय दु:खी राहतात. ।।१।।

**अफूं बिनाँ ज्यूँ अमली दुखिया ।। दाता दु:खी धन रीता ।।**
**रेण बिणा जूं गुघु दुखिया ।। भूप दुखी बिन जीता ।।२।।**

व्यसनी अफु मिळाले नाही तर दु:खी राहतात.दाता दान करण्यास धन नाही राहीले, तर धन प्राप्त करण्याकरीता दु:खी राहतो.घुबड अंधारी रात्रीच्या प्रतिक्षेमध्ये दु:खी राहतो लढाईमध्ये राजा शत्रुला जिंकण्याकरीता दु:खी राहतो.तसे हरीजन रामजी प्राप्त करण्यासाठी दु:खी राहतात. ।।२।।

**मीठा जळ बिन सायर दुखिया ।। चंद दु:खी बिन हीरा ।।**
**जन सुखराम रात दिन दुखिया ।। लगी सब्द की पीरा ।।३।।**

सागर गोड पाण्याकरीता दु:खी राहतो म्हणजे आपले पाणी कोणी ही पित नाही या करीता सागर दु:खी राहतो.चंद्र त्याच्या प्रकाशाने नेहमी हीरे बनऊ शकत नाही म्हणून दु:खी राहतो.असेच आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की हरीजन शब्द प्राप्त

करण्याच्या पिडेने रात्रदिवस दु:खी राहतात. ।।३।।

३०५

।। पदराग गुड ।।

**सब बिध सारण काम**

**सब बिध सारण काम ।। पिया मुझ दरसण दिजे हो ।।**
**ओगण गारी रा पीव ।। पिया मोय दरसण दीजे हो ।।टेर।।**

प्रितम(पती,मालक)तुम्हीच सर्व विधीचे काम निपटविणारे आहात,मला येऊन दर्शन द्या. मी अवगुणांनी भरलेली अवगुणी आहे.माझे प्रितम मला दर्शन द्या.।।टेर।।

**रूतवंती रूत ऊतरे प्रभू ।। ब्याकूळ भयो सरीर ।।**
**बेगा बेग पधारज्यो प्रभू ।। आतम धरे न धीर ।।१।।**

जसी ऋतुवंती स्त्रीचे ऋतू काळात शरीर व्याकूळ होऊन जाते तर प्रभुजी लवकर लवकर या,तुमच्याशिवाय आत्मा धैर्य धारण करीत नाही म्हणजे ठेवत नाही.।।१।।

**जळ बिन नागर बेलडी प्रभू ।। पोप फूल कुमलाय ।।**
**तुम बिन आतम सुंदरी प्रभू ।। यूँ दुख अंतर मांय ।।२।।**

पाण्या विणा नागवेल सुकून जाते आणि दुसऱ्या प्रकारचे फुल आणि पुष्प ही सुकून जातात. त्याच प्रकारे ही आत्मा सुंदरी प्रभूजी तुमच्याशिवाय आतून दु:खी होऊन राहीली. ।।२।।

**जळ खूटा सर सुकीये हो ।। दादुर दु:ख अपार ।।**
**मीन दुखी जळ बाहरी प्रभू ।। तुम बिन आतम नार ।।३।।**

जेंव्हा पाणी समाप्त होऊन सरोवर सुकून जाते.त्यावेळी सरोवराच्या बेडकांना अपार दु:ख होऊन जाते आणि पाण्या विना मासोळी मरुन जाते.त्या प्रकारे प्रभूजी,तुमच्याशिवाय ही आत्मा नारी खूपच दु:खी आहे. ।।३।।

**पपयो पिव पिव करे प्रभू ।। चंदर दिष्ट चकोर ।।**
**जन सुखिया युँ आतमा रे ।। लगी ब्रम्ह सु डोर ।।४।।**

चातक पक्षी पाण्याकरीता पीव पीव करतो आणि चकोर पक्षी चंद्रामध्ये दृष्टी लावतो. (ती दृष्टी चंद्रमावरुन हटवतच नाही.)आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, त्याच प्रकारे या आत्म्याची ही ब्रम्हशी डोर लागलेली आहे. ।।४।।

३६५

।। पदराग बिहगडो ।।

**संतो मै तो करम अभागी**

**पूरब करम इस्या मुझ मांही ।। दुबध्या अजुहन भागी ।।टेर।।**

संत मी नीच कर्मी आहे.मी परमसुखाचे पद प्राप्त करण्यासाठी अभागी आहे.माझे पूर्व जन्माचे कठीण नीच कर्म आहे.या कारणाने मी सतगुरु समजू शकलो नाही.मी सतगुरुंना

जगाच्या बरोबरीचा मनुष्यच समझलो ही दुविधा असल्याने माझे सतगुरु माझे महादु:ख कापून देणारे समर्थ असून देखिल ही माझे सतगुरु माझे दु:ख कापून देतील ही माझी दुविधा अजून ही मिटली नाही. ।।टेर।।

**सतगुरू मेरे किरपा किनी ।। घर बैठा पद दीया ।।**
**मेरा लछ इस्या उर मांही ।। दरसण जायन किया ।।१।।**

सतगुरुंनी माझ्यावर दया करुन घरी बसून घटात परमपद दिले.परंतु माझ्या हृदयात सतगुरुं बद्दल दुविधा हे निच लक्षण होते.त्यामुळे सतगुरु घरी आल्यावरही मी त्यांचे दर्शन केले नाही. ।।१।।

**ज्यां पद पुरण मोकुं दिया ।। भरम भाँज समजाया ।।**
**वाँ कूं छाड़ किया गुरू ओरी ।। एसा करम कमाया ।।२।।**

ज्या सतगुरुंनी मला परमपद दिले माझे भ्रम तोड्ले अश्या सतगुरुंना सोडून मी अन्य कान फुंकणारे गुरु धारन केले.असे असे माझे निच बुध्दी देणारे पूर्वीचे माझे कमावलेले कर्म आहे. ।।२।।

**वां मो सूं गुण एसा कीया ।। जम दावा सब मेटया ।।**
**ध्रिगध्रिग जो जुग जनम हमारो ।। सनमुख जाय न भेटया ।।३।।**

माझ्या सतगुरुंना दयावान गुणाने माझे अनंत जन्माचे यमाचे दावे कापले गेले तरीही मी माझ्या सतगुरुंच्या त्यांच्या सन्मुख जाऊन भेटलो नाही.मी माझा अनमोल मनुष्य देह अन्य गुरुंच्या कर्मकांडात,चमत्कारात लावून गमवून दिला.माझ्या अश्या मनुष्य जन्मास धिक्कार आहे,धिक्कार आहे.।।३।।

**धिन सतगुरू धिन समरथ सामी ।। मेरी कसर न जोई ।।**
**मै तो बेल बोहोत बिध हुवा ।। गुरू बिरच्या नी कोई ।।४।।**

माझे सतगुरु धन्य आहे.माझे समर्थ स्वामी धन्य आहे.माझ्या सतगुरुंनी माझी निच हरकत पाहीली नाही.माझ्या मनात दुविधा आल्याने मी तर सतगुरुंशी खुप वेळा भ्रमित झालो.परंतु माझे सतगुरु माझ्यापासून थोड्ही दुर गेले नाही.माझ्यावर दया करण्यात थोड्ही बदलले नाही.।।४।।

**के सुखराम मूवा मै डोलू ।। जनम अकाजा भाई ।।**
**जब लग मेरे गुरू की सेवा ।। मो सूं बणीयन काई ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात मी जीवंत असूनही मेल्यासारखे जगून राहीलो आहे.माझा जन्म व्यर्थ गेला.माझ्याने जो पर्यत गुरुंनी सांगीतलेली सतस्वरुपाची भक्ती होत नाही तो पर्यत मी जिवंत राहीलो तरी मेल्यासारखेच जगून राहीलो असे सतज्ञान मला समजून सांगीतले.।।५।।

७६

।। पदराग बिलावल ।।

**भगत करावो दास सूं**

**भगत करावो दास सूं ।। तो बिरह दो चेरी ।।**

**तलप बीना प्रभू ना सजे ।। भगती जुं तेरी ।।टेर।।**

हे साई मी आपला दास आहे.माझ्याने आपली भक्ती करवून घ्या.माझ्यात आपल्या– साठी विरह म्हणजे प्रेम प्रीत प्रगटवा माझ्यात भक्ती करण्याची शुरविरता प्रगटवा.तलब लागल्या शिवाय तुझी भक्ती कोणास सुचू शकत नाही.म्हणून आपण माझ्या घटात आपली भक्ती करण्याची तलब प्रगट करुन द्या. ।।टेर।।

**बिरह बीना तेरी भगत सूं ।। प्राणी दु:ख पावे ।।**

**ज्युं निरबळ डांडी चले ।। मुख ना जन भावे ।।१।।**

माझ्यात आपली भक्ती करण्याची तलब प्रगट होत नाही म्हणून माझे प्राण दु:खी होत आहे.ज्युं निरबळ डांडी चले ।। मुख ना जन भावे ।। अर्थ लागला नाही. ।।१।।

**में मांगूँ बेराग कूं ।। किरपा करो सांई ।।**

**बिन तरळे ईण जीव सूं ।। सिंवरण हुवे नांई ।।२।।**

हे साई मी आपणास माझे कुळ परीवार,धन,राज्याचा मोह ममता भंग होईल अश्या बैराग्याची भीख मांगत आहे.हे साई आपण कृपा करुन माझ्यात कुळ परीवारातील मोह ममतेला त्यागन्याचे वैराग्य प्रगट करुन द्या.माझ्या जीवाने तुमच्याशी विरह प्रगट झाल्याशिवाय तुमचे स्मरण होत नाही. ।।२।।

**सूरातन अंग भेजीये ।। मतवाळो किजे ।।**

**के सुखदेव अंग बाहीरी ।। भगती नही दीजे ।।३।।**

मी आपल्या भक्तीत मतवाला होउन जाईल असे माझे मन शुरवीर करुन द्या.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात ।।३।।

७७

।। पदराग हिन्डोल ।।

**भगत करे जन सूरा हो**

**नहि कायर का काम साधो ।। भगत करे जन सुरा हो ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,जसे जगात भित्रे व शुरवीर सैनिक राहतात तसेच भक्तीत भित्रे व शुरवीर संत असतात.भित्रे सैनिक हे कधी लढाई जिंकू शकत नाही.तसेच मायेला घाबरणारा मनुष्य ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती व सर्व अवतार हे कोप करतील का?अशी भिती ठेवणारा भित्रा काळाला कधीही जिंकू शकणार नाही परंतु शूरवीर सैनिक हा लढाई कितीही जबर असली तरीही तो आपली मान कापेपर्यंत

लढाई लढतो आणि शत्रुला पूर्णपणे नष्ट करुन लढाई जिंकतो.अश्याप्रकारे शुरवीर संत काळा बरोबरची लढाई कितीही जबर असली तरी तो आपल्या शरीरावर पडणारे दु:ख, माता–पिता,पत्नीला होणारे दु:ख याची चिंता न करता सतस्वरुपाची भक्ती करतो. काळाला जिंकून होणकाळाचे पद त्यागून महासुखाच्या अमरापूरला जातो.।।टेर।।

**तन धन की सो आस न राखे ।। मस्त हुवे मगरूरा हो ।।१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,जसे शूरवीर सैनिक युध्दात लढण्यास जाते वेळी आपले शरीर नष्ट होऊन जाईल व शरीर नष्ट झाल्यावर कुटूंब परिवारा–करीता ठेवलेले धन जगातील लोक पचवून घेतील आणि कुटूंब परिवाराला खाण्या–पिण्याची फिकीर पडेल याचा जराही विचार न करता लढाई लढण्यात मिळत आहे या अभिमानाने मस्त होऊन युध्द लढतो अश्याप्रकारे शूरवीर संत वैराग्य–विज्ञान भक्ती करते वेळी ब्रम्हा,विष्णु,महेश,शक्ती व देवी देवता हे कोपतील व जीवाला त्रास देतील याची जराही चिंता फिकीर न करता काळापासून मुक्त होत आहे याच गर्वाने मस्त होऊन सतस्वरुपाची धुव्वाधार भक्ती करतो.(कोणाचाही विचार न करता)।।१।।

**कपट कळेजो काट बगावे ।। सांसो सीस तन दूरा हो ।।२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,शुरवीर आपली मान कापल्यावरही धैर्याने लढतो आणि युध्द जिंकल्यावर आपले काळीज आपल्या हाताने कापून आकाशात फेकतो आणि शरीर नेहमी करीता त्यागतो अश्या शूरवीरास देवकन्या विवाह करुन घेऊन जाते.अश्याप्रकारे शूरवीर संतजन होणकाळाने बनविलेल्या सर्व काळाच्या चरीत्रा सोबत धैर्याने लढतो.ब्रम्हा,विष्णु,महेश,शक्तीच्या सुखा सोबत जोडलेल्या कपटी काळजाचा पूर्ण–पणे नाश करतात आणि सतस्वरुप पार्षद सोबत महासुखाच्या अमरापूरास जातात. जसे शुरवीर सैनिक लढाईत मरण्याची फिकीर आपल्या मनातून,शरीरातून पूर्णपणे काढून दूर फेकून देतो व युध्द लढतो.असेच शुरवीर संत कुटूंब परिवार व स्वत:वर पडणाऱ्या दु:खाला आपल्यातून काढून टाकतो आणि काळासोबत फार भारी धैर्याने लढाई लढतो.।।२।।

**मात पिता की बात न माने ।। नार सनेही कूरा हो ।।३।।**

जसे शुरवीर सैनिक आई–वडील व पत्नीपासून मिळणाऱ्या सुखाच्या गोष्टीत न अटकता युध्दास निघतो,तसेच शुरवीर संत माया माता आणि ब्रम्ह पिता व रिध्दी–सिध्दी पत्नीचे परचे चमत्काराची गोष्ट न मानता म्हणजे चमत्काराच्या सुखात न अटकता वैराग्य विज्ञानाचा संताचे परचे ऐकून पश्चिमच्या रस्त्याने दसवेद्वारात जाण्यास निघतो.।।३।।

**बाजा सुण सुण बोहो छोहो आवे ।। बरसे मुख पर नूरा हो ।।४।।**

युध्दाचे वाजे,दुदंभी ऐकून–ऐकून शूरवीराला खुप उत्साह येतो व युध्दाचे बाजे ऐकून

शुरवीराच्या चेहऱ्यावर नूर म्हणजे तेज येऊन जाते.याप्रकारे विज्ञान भक्ती करणाऱ्या शुरवीर संतांची दशा अणभै देशाची वाणी ऐकून–ऐकून होऊन जाते.।।४।।

**के सुखराम संत जन सोई ।। बेण कहे मुख पूरा हो ।।५।।**

जसे शूरवीर सैनिक शत्रुला मारण्याचे वचन मुखाने बोलतो आणि तसेच्या तसे ते वचन पूर्ण करतो.असेच शूरवीर संत काळाला मारुन दसवेद्वारात साईच्या दरबारात पोहचण्याची चाहना(इच्छा)मनात ठेवतो व तशीच्या तशीच मनाची ती चाहना(इच्छा)पूर्ण करतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानी,स्त्री–पुरुषांना सांगत आहे.।।५।।

१४५

।। पदराग हिन्डोल ।।

**हरजन हरगुन गावे हो**

**नाँव निसाण रूपावे साधो ।। हरजन हरगुन गावे हो ।।टेर।।**

हरजन हर रामजीचा गुण गातात आणि रामनामाचा निशाण रोवतात.हरजन हे तर रामजीचा गुण गातात. ।।टेर।।

**बोहो दुःख ताव पडे शिर आई ।। सुख संपत जे जावे हो ।।१।।**

त्यांच्या मस्तकावर पुष्कळ तऱ्हेचे दुःख आणि संकट ताप येऊन पडतात आणि त्यांची सुख आणि संपत्ती सर्व क्रुर लोक हिसकवून घेतात.तरी पण ते रामजीचाच गुण गातात. ।।१।।

**जे ओ जगत रूस रहे सारो ।। घर कुळ गाँव छुडावे हो ।।२।।**

हा सर्व संसार रुसून गेला आणि घर कुळ आणि गाव सोडवून बाहेर काढून देतात.तरी ही ते संत रामजीचाच गुण गातात. ।।२।।

**देश निकाळो जे दे राजा ।। तो राम नाम लिव लावे हो ।।३।।**

जर देशाचा राजा देश निकाळा देतील,(आपल्या देशातून आपल्या हद्दीच्या बाहेर काढून देतील.)तरी ते संत रामनामाशीच लव लावतील.(रामनाम सोडण्याबद्दल जोधपुरच्या विजयसिंह राजाने हरकारामजी आणि मनसारामजी रामनामी नागोरवाल्यास रामनाम सोडा किंवा चौतीस हजार रुपये दंड द्या.हा दंड ऐकून त्यांनी रुपयाच्या थैल्या गाड्यात भरुन नेऊन राजापुढे टाकल्या आणि रवाना होते वेळी राजास राम राम करुन रवाना झाले.तेंव्हा राजा म्हणाला की तुम्ही अधिकही राम राम करता काय.तेंव्हा हरकारामजी म्हणाले हा दंड आम्ही कशाचा दिला आहे.रामनाम सोडीत नाही,म्हणूनच आम्ही दंड दिला.जर आम्ही राम राम घेणे सोडला असता तर तुम्ही दंड कशाचा घेत होते आणि आम्हीही दंड कशाचा देत होतो.हा रामनाम न सोडण्याबद्दलच आम्ही दंड दिला आहे. मग आम्ही रामनाम कसा सोडणार.रामनाम न सोडण्याबद्दल राजाने यांना देशाच्या बाहेर हद्दपार जाण्याचा हुकूम देऊन दिला.हे म्हणाले आम्ही तुमच्या राज्यात पाणीही पिणार

नाही.तुझ्या राज्यातून पार होण्याकरिता दहा दिवस लागो किंवा पंधरा दिवस लागो.जो रामनाम घेण्यास मनाई करतो,त्याच्या राज्यात आम्ही पाणीही पिणार नाही.) ।।३।।

**जाँ पूळ आण चंपे नर कोई ।। वो तन छोह चड़ावे हो ।।४।।**

ज्या पळात म्हणजे वेळात कोणी मनुष्य शुरवीर सतांस रामनाम सोडण्याबद्दल धमकी देईल,दाबेल,तर ते आपल्या शरीरात रामनाम घेण्याकरीता आणखीही पुष्कळ उत्साहीत होतात आणि रामनाम घेण्यात थोडेसेही दाबले जात नाही. ।।४।।

**के सुखराम साच जन सोई ।। राम नाँव लिव लाते हो ।।५।।**

आदि सत्गुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो रामनामची लव याप्रकारे लावतात, तेच खरे संत आहेत. ।।५।।

१५१

।। पदराग जोग धनाश्री ।।

**हरिजन सूरा हरिजन सूरा**

**हरिजन सूरा हरिजन सूरा ।। भीड़ पड़्या लिव दूणी बे ।।टेर।।**

हरिजन शुरवीर असतात.त्यांच्यावर संकट आल्यावरही त्यांची रामजीशी लिव कमी होत नाही तर उलट दुप्पट होते.।।टेर।।

**सांकळ तोख जडे. गळ मांही ।। फेर भागसी मांरे बे ।।**

**दुष्टि ही ताब बोहोत बिध देवे ।। हर हर इधक पुकारे बे ।।१।।**

दृष्ट लोक हरिजनाला खुप यातना देतात जेल सारख्या अंधाऱ्या कोठीत टाकतात व मारतात.लोखंडाच्या साखळीने बांधुन गळ्यात तोख बांधतात असे हरिजनाला खूप सारे कष्ट देतात तरीही हरिजन रामनाम घेणे न सोड्ता जास्तीत जास्त रामनाम घेतात असे हरिजन शुरवीर असतात. कबीर साहेबांच्या गळ्याला,सिकंदर बादशहाने साकळदंडाने बांधून पाण्यात बुडविले होते आणि रामनामी महाराज हरकारामजी आणि त्यांचे भाऊ मनसारामजी व मुलाबाळांना सुध्दा जोधपूरच्या राजाने अंधाऱ्या कोठडीत टाकले होते त्या सर्वांना पस्तीस दिवसापर्यंत अन्न व पाणी काही ही दिले नव्हते व त्यांच्या मुला बाळांनीही अन्न पाणी काही ही घेतले नाही तरीही त्यांनी रामनाम घेणे सोड्ले नाही. ।।१।।

**देस मुलक घर बार छुडावे ।। सुत बित्त कोसर लेवे बे ।।**

**बोहो बिध ताव पडे सिर ऊपर ।। सुरत नाव पर देवे बे ।।२।।**

संतांचे मुलगा,मुलगी,पत्नी,धन,शेती,घर हिसकावून घेतात व मुलखाच्या बाहेर दूर भुकेले तहानलेले उपाशी राहतील किटक प्राण्यांपासून धोखा होईल अशा जंगलात पाठवून देतात असे असे अनेक संकट हरिजनाच्या शिरावर येतात तरी ही हरिजन आपली सुरत संकटांवर न लावता रामनामावर लावतात,असे हरिजन शूरवीर राहतात.।।२।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**दूजी भीड़ पडे सिर केती ।। दिन मे सो हो सो हो आइ बे ।।**
**जबलग सास खुलासा घट मे ।। राम राम कहे भाई बे ।।३।।**

दूसरे ही अनेक संकट शंभर शंभर वेळा हरिजनाच्या शिरावर पडतात तरी ही हरिजन उदास न होता उल्हासाने जो पर्यंत शरीरात श्वास चालतात व शरीरात प्राण आहे तो पर्यंत राम राम बोलतात असे हरिजन शूरवीर राहतात. ।।३।।

**दुख सुख सबे नाँव पर वारे ।। निछरावळ कर देवे बे ।।**
**ओ तन सास जीव मन चेतन ।।जाहाँ लग सिमरथ सेवे बे ।।४।।**

दुःख व सुख रामनाम घेण्याच्या उल्हासावर ओवाळून देतात व त्यांच्या शरीरात जो पर्यंत मन आहे,जीव आहे व चैतन्यता आहे तो पर्यंत उल्हासाने समर्थाला भजतात असे हरिजन शूरवीर असतात. ।।४।।

**ससी अर सूर पिछम दिस ऊगे ।। गंग उलटी बह जावे बे ।।**
**कह सुखराम तो ही जन सूरा ।। राम राम लिव ल्यावे बे ।।५।।**

चंद्र व सूर्य पूर्वेकडून उगवतात व पश्चिमेला मावळतात.गंगा पहाडावरुन धरतीवर वाहते असे चंद्र व सूर्य पूर्वेच्या ऐवजी पश्चिमेला उगवले व गंगा धरतीकडून पहाडाकडे उलट दिशेने वाहू लागली म्हणजे कधी पाहिले नाही इतके कष्ट दायक दुःख पडले तरीही हरिजन विचलीत न होता रामनामाच्या लिव मध्ये पक्के राहतात रामनाम घेतल्याने क्षणभर ही लिव हटवत नाही असे हरिजन शूरवीर असतात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले.।।५।।

१६२
।। पदराग जोग धनाश्री ।।

**जम जालम हे जम जालम हे**
**जम जालम हे जम जालम हे ।। सावधान होय लडना रे लो ।।**
**अबके मोसर आण बण्यो हे ।। सुध बुध कारज करणा रे लो ।।टेर।।**

यम जालिम आहे यम जालिम आहे त्याच्याशी लढाई करायची आहे तर हुशार होऊन लढले पाहिजे.यमाशी जिंकण्याकरीता तुला रामजी पासून मनुष्य देह मिळाला आहे.ही वेळ यमाशी लढण्याकरीता खूप चांगली आली आहे.आता तू सुधबुध ने यमाशी लढण्याचे काम कर.।।टेर।।

**सिळ साच को बक्तर पेरो ।। लीव समसेर समावो रे ।।**
**जरणा की ढाल जुगत सू बांधो ।। इस बिध लड़वा जावोरे लो ।।१।।**

लढाईत शत्रु पक्षाशी लढतांना आपल्या शरीराचे रक्षण करण्याकरीता धातूपासून बनवलेले चिलखत घालावे लागते.हे चिलखत शत्रुचे बाण तसेच भाले शरीरात घुसु देत नाही व लढणाऱ्याला मरण्यापासून वाचवतात अशाप्रकारे संताला शिल म्हणजे आपल्या विवाहीत

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

स्त्रीशीच संबंध ठेवले पाहिजे अन्य कोणत्या स्त्रीशी संबंध नाही येऊ दिले पाहिजे ही सावधानी बाळगली पाहिजे.ही सावधानी न बाळगल्याने यम संताने प्राप्त केलेल्या मोठ्या मनुष्य देहाच्या संधीला धोका करु शकतो.लढाईत या लोखंडाच्या चिलखतसोबत आपला राजा शत्रु राजापेक्षा महाबलवान आहे हे चिलखत घालतो.या चिलखताने शत्रुशी लढतांना निर्भय होऊन लढता येते.असे परमात्मा म्हणजे गुरु काळाला मारण्यात पराक्रमात बलवान आहे.असा विश्वास गुरुवर आला पाहिजे.या विश्वासाने काळाशी लढतांना संताला निर्भयता येते.शत्रु पक्षाशी लढण्याकरीता तलवार लागते असेच काम शत्रुशी लढण्या–करीता रामनामाची लिव लावून भजन करण्याची तलवार लागते.या तलवारीने वैराग्य प्राप्त होऊन मोह,ममता,काम,क्रोध,लोभ,मत्सर,अहंकार यांचा नाश होतो.शत्रु पक्षाच्या तलवारी झेलण्याकरीता युक्तीने ढाल बांधावी लागते व ती ढाल तलवारीचे वार झेलण्याकरीता युक्तीने उपयोगात आणावी लागते असेच काळ शत्रुच्या क्रोध सारख्या तलवारी झेलण्याकरीता जरणा म्हणजे सहनशिलतेची ढाल युक्तिने उपयोगात आणावी लागते.अशाप्रकारे काळाशी लढण्याकरीता शिल,विश्वास,लिव,जरणा या सावधगिऱ्या ठेवाव्या लागतात.।।१।।

**नेम कटारो कस कर बांधो ।। बिरहे तोफ कूं छोडो रे ।।**
**चड बेराग तुरंग के उपर ।। काळ फोज कूं मोडो रे लो ।।२।।**

शुरवीर शत्रुला मारण्याकरीता पोटाला कट्यार खुप मजबूती ने बांधुन ठेवतात व शत्रुला मारण्याची संधी हातात येताच पोटाची कट्यार मारुन त्याला संपवून टाकतात असेच संताने साधु लक्षणाचे ६४ चे ६४ नियम मजबूतीने पाळले पाहिजे.लढाईत शत्रुंना मारण्या –करीता तोफा चालवाव्या लागतात असेच काळाचे दूत काम,क्रोध,मोह,ममताला मारण्याकरीता रामजीची विरहाची तोफ चालवावी लागते.लढाईत स्वार होण्याकरीता घोडा पाहिजे असेच मोह,ममता कामावर स्वार होण्याकरीता ज्ञान वैराग्य हा घोडा पाहिजे अशा प्रकारे या सर्व अस्त्रांचा उपयोग करुन काळ फौजेला पलटविले पाहिजे. ।।२।।

**सिंवरण सेल भजन कर भाला ।। मत की गहो कबाणी रे ।।**
**सुरत निरत को बाण करीजे ।। कोट किल्ला कर बाणी रे लो ।।३।।**

लढाईत जसा मोठा भाला पाहिजे असे काळाला मारण्याकरीता रामनाम भजन स्मरणाचा मोठा भाला पाहिजे.शत्रु पक्षाला मारण्याकरीता कबाण पाहिजे अशी ने:अक्षराच्या मताची कबाण पाहिजे.या कबाणीने काळात टाकणारी माया मारता येते.कबाणीने शत्रुला मारण्या–करीता तीर पाहिजे असेच सुरत व निरत हे तीर शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध या काळ कर्म करणाऱ्या विकारांना मारण्याकरीता पाहिजे.जसे किल्ल्याची शरण घेणाऱ्याला

किल्ल्याच्या बाहेरच्या शत्रुची गोळी,बाण किंवा तलवार लागत नाही तसेच सतगुरुच्या वाणीच्या आश्रयात राहणाऱ्याला सतगुरुच्या वाणीत सांगितलेल्या ज्ञानानुसार चालल्यावर काळाचा वार लागत नाही असा हा सतगुरुच्या वाणीचा किल्ला व कोट आहे.या किल्ल्यात राहणाऱ्याला भय होत नाही. ।।३।।

**चित्त की छुरीयाँ बाण कर मन का ।। सास सोकरडां किजे रे ।।**
**अगज ज्ञान त्याग कर तोफाँ ।। भ्रम ढाय सब दिजे रे लो ।।४।।**

जसे रणात शत्रुला फेकुन मारण्याकरीता चाकू व बाण राहतात असे काम,क्रोध,लोभ, मोह,मत्सर,अहंकार,शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध या विकारांना मारण्याकरीता ज्ञान वैरागी चित्त व ज्ञान वैरागी मनाचा उपयोग घे.शत्रुच्या समूहावर वार करण्याकरीता शत्रुच्या समूहावर धाऊन जावे लागते तसेच काळ कर्मांवर रामनामाच्या श्वास उच्छ्वासाची धार लावावी लागते.लढाईत तोफेच्या कामात आणणाऱ्या एक तऱ्हेच्या गोळ्याला गजफा म्हणतात.ही गजफा तोफेत ठेवून शत्रुवर शत्रुचा नाश करण्याकरीता फेकतात असेच गुरुच्या ज्ञानाचे गजफ्याला त्रिगुणी मायेच्या सुखांच्या त्यागाची तोफेत ठेवून मायेने बनविलेल्या भ्रमरुपी किल्ले(ढासळून)पाडले पाहिजे. ।।४।।

**सस्तर सबे बांध यूं लीजे ।। राड़ निसो दिन किजे रे लो ।।**
**के सुखराम जीत गढ चडीया ।। बोहोर न जलम धरी जे रे लो ।।५।।**

अशाप्रकारे सर्व शस्त्र सोबत घेऊन यमाशी रात्रंदिवस लढाई कर.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.असा शस्त्रांचा उपयोग करुन यमाशी लढ व यमाशी जिंकून ब्रम्हंड गडावर चढून जा.गडावर चढून गेल्यानंतर होणकाळात कधी जन्म होणार नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।५।।

१६५
।। पदराग हिन्डोल ।।

**जनसा सूर न कोई हो**
**तीन लोक फिर जोई साधो ।। जनसा सूर न कोई हो ।।टेर।।**

मी तिन्ही लोक फिरुन पाहिले,परंतु संतजना सारखा शूरवीर कोठेही,कोणीच दिसला नाही. ।।टेर।।

**राजा राव घडी पल जूंझे ।। पीछे जुग सा होई हो ।।१।।**

येथे राजा आणि रंक घटांभर किंवा पळभर झुंजून मागाहून जसेच्या तसे जगाचे मनुष्या सारखे होऊन जातात.परंतु हे संतजन तर सतस्वरुपाची भक्ती करण्यात जन्मभर माया आणि काळाशी झुंजतात.परंतु त्यांचा भक्ती करण्याचा शूरवीरपणा,यांचा कधीही नाही उतरत. ।।१।।

**बामण भाट करे सो तागा ।। च्यार दिनाँ दु:ख होई हो ।।२।।**

ब्राम्हण आणि भाट हे त्रागा करतात.त्यांचे त्यांना,चार दिवसापर्यंत दुःख होते.(मग घाव भरुन दुरुस्त होऊन जातात.)परंतू संतजनाचा घाव जन्मभर मिटत नाही आणि संतजन पुन्हा जगाचा लोकांसारखे होत नाही. ।।२।।

**आठ पोहोर बिन खांडे जूंझे ।। निमकन भूले सोई हो ।।३।।**

हे संत जन रात्रंदिवस,अष्टौप्रहर तलवारीचा शिवाय माया आणि काळाशी झुंजत राहतात तरीपण भक्ती करणे एक निमिष मात्रही विसरत नाही.या तऱ्हेचे संतजन शूरवीर राहतात.।।३।।

**ओर सूर सब काया मारे ।। आतम जन छिन खोई हो ।।४।।**

दुसरे शूरवीर तर सर्व,आपल्या शरीरास मारतात.परंतू संतजन तर आपल्या आत्म्याला क्षीण करुन गमावून देतात. ।।४।।

**के सुखराम सुरां नर माँही ।। या सम सूर न होई हो ।।५।।**

आदि सत्गुरु सुखरामजी महाराज सांगतात,मनुष्यामध्ये संतजना सारखा शूरवीर कोणीच,मनुष्य होऊ नाही शकत. ।।५।।

१८७

।। पदराग बिलावल ।।

## जुग सोभा चाहुँ नहि

**जुग सोभा चाँहु नहि ।। सुख संपत कोई ।।**
**करामात करतूत की ।। ईछया नाँ माई ।।टेर।।**

माझी संसारात शोभा व्हायला हवी अशी माझी इच्छा नाही म्हणून ज्याच्याने माझी जगात शोभा होईल अशी मला धन संपत्ती,सुख संपत्ती मिळाली पाहिजे किंवा मला जगाचे लोक मानतील असे पर्चे(कला)चमत्कार करता आले पाहिजे ही इच्छा नाही मला सतगुरु सत (सच्चे)मिळायला पाहीजे ही इच्छा आहे.।।टेर।।

**हे कोई अेसा सूरवाँ ।। मन कूं समझावे ।।**
**हद बेहद कुं छाड़ के ।। मोरी दिस आवे ।।१।।**

असा कोणी शुरवीर जगात आहे का?जो माझ्यां मनाला सतगुरु सतची चाहना आहे ती पूर्ण करेल व मला हद बेहद सोडून सतगुरुच्या दिशेला घेऊन जाईल. ।।१।।

**जंतर मंतर टोटका ।। ओर कळा सारी ।।**
**हमा नगर के मांय ।। इछया माने नही मारी ।।२।।**

जंतर मंतर(यंत्र,मंत्र)तोटके आणि बाकी सारी कला व हमानगरच्या आत म्हणजे होणकाळ नगरात राहण्याची माझी इच्छा नाही. ।।२।।

**देव कळा दाणो कळा ।। भगवत कळ सारी ।।**
**दुरबळ कूं माने नही ।। अेसी कुदरत न्यारी ।।३।।**

मला देवतांचे पर्चे चमत्कार,राक्षसांचे पर्चे चमत्कार,भगवंत म्हणजे होणकाळ पारब्रम्हची कला कुदरतमध्ये पोहचविण्याकरीता दुर्बल दिसते व कुदरत या सर्व कलांपेक्षा वेगळी आहे.।।३।।

**हे कोइ असो सुरवो ।। मन कुं समझाये ।।**

**----------।।----------।।४।।**

असा जगात कोणी सतगुरु सत प्राप्त झालेला शुरवीर आहे का?जो माझ्या मनाला कुदरत समजावू शकेल. ।।४।।

**मात पिता दोनु तजे ।। गुरू की मा मुंडे ।।**

**धिन हंसा सुखराम के ।। सतगुरू मत ढूंडे ।।५।।**

ज्याने माता म्हणजे त्रिगुणी माया व पिता म्हणजे पारब्रम्ह होणकाळाला त्यागले व काळाच्या मुखात ढकलणाऱ्या सर्व गुरुंपासून तोंड फिरविले आहे व ज्याने सतगुरुंचे सत प्राप्त केले आहे तेच मला कुदरत दाखवतील. ।।५।।

२५६

।। पदराग हिन्डोल ।।

## ओर सकळ बिध सेली

**ओर सकळ बिध सेली ।। भगती का काम करारा हो ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,भक्ती करण्याचे काम खुप कठिण आहे. भक्ती करण्यामध्ये मनाला त्याच्या मताने चालण्याला थांबवावे लागते.हे थांबविण्याचे काम माझ्यासाठी खूप कठिण आहे म्हणून माझ्या करीता भक्ती करण्याचे काम कठिण आहे.ज्या कामामध्ये मनाला त्याच्या मताने चालण्याला थांबवावे लागत नाही ते सर्व कठिणहून कठिण काम ही माझ्याकरीता खूप सहज आहे.।।टेर।।

**जे सुण साहिब बाँय संभावे ।। तो कोइ उतरे पारा हो ।।१।।**

मला माझ्या बळावर भवसागरातून पार होणे कठिण आहे हे समजते साहेब माझे बाहू सांभाळतील तरच मी पार उतरु शकेल असे मला सतशब्दाने समजते,सतज्ञान होते. ।।१।।

**धण देणा वे तो सुण सेली ।। सेली जुग को बुहारा हो ।।२।।**

पोटापुरती पोळी ही राहणार नाही असे पूर्ण धन वाटून निर्धन होऊन जाणे असा कठिण व्यवहार ही माझ्याकरीता सहज आहे परंतु भक्ति करणे कठिण आहे.।।२।।

**मर मिटणो व्हे तो सुण सेली ।। सेली चोरी धाड़ा हो ।।३।।**

भांडणात मरुन मिटून जाणे,चोऱ्या करुन डाके टाकून राज्याचे दंड भोगणे,जेल भोगणे हे सर्व माझ्याकरीता सोपे आहे परंतु भक्ती करणे कठिण आहे.।।३।।

**घर छिटकाय चले सो सेली ।। सेली मूंड मुंडारा हो ।।४।।**

घर,पत्नी,मुलगा,मुलगी,राज्य,धनसंपदाचे सुख नाही घेणे त्यागून देणे व आपले शिर मुंड्न करुन बैरागी होणे या सर्व विध्या माझ्याकरीता सहज आहेत परंतु भक्ती करणे कठिण आहे.।।४।।

**इमरत छाडज देणो सेली ।। सेली बिष बिकारा हो ।।५।।**

अमृतासारखी सुख देणारी वस्तु त्यागने सोप आहे विषयरसांना त्यागने सोपे आहे परंतु भवसागर पार करवून देणारी भक्ती करणे कठिण आहे.।।५।।

**जप तप तीरथ संजम सेली ।। सेली साँग शिर धारा हो ।।६।।**

बावन्न अक्षरांचे जप करणे,पाची इंद्रियांना तपवणे,अड्सष्ट तिर्थ करुन शरीराला गाळणे, संयम पाळणे म्हणजे ब्रम्हचर्याने राहणे माझ्या करीता सोपे आहे परंतु भक्ती करणे माझ्या करीता कठिण आहे.।।६।।

**सेली डाक अगन में पडणो ।। सेली डंड शिर भारा हो ।।७।।**

जोहर सारखा उडी मारुन आगीत पड्णे,शरीराची राख करणे,राज्याचा भारीहुन भारी दंड शिरावर घेणे व भोगणे व शिरावर चपला बुट ठेवून बेइज्जत होणे सोपे आहे परंतु भक्ती करणे कठिण आहे.।।७।।

**के सुखराम आ भगत दोहोली ।। दोरो मन मतवारा हो ।।८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मला मदोन्मत्त हत्ती सारखे अलमस्त झालेल्या मन माताला थांबवणे खूप कठिण आहे म्हणून मला भक्ती करणे खुप दोरी (कठिण)दिसते.।।८।।

२२२

।। पदराग सोरठ ।।

**मन रे करडी बिना सब काची**

**ललफल माँहे नही फळ दायक ।। क्हां बूरी क्हां आछी ।।टेर।।**

अरे मन,अरे जीव अमरलोक प्राप्त करण्याकरीता करडा म्हणजे कड्कपणा ठेव. कड्कपणा शिवाय सर्व कच्चापण आहे.ललफल म्हणजे कच्चेपणात उंच सतस्वरुपाची भक्ती तर काय हलकी भेरु,भोपा,खेतपाल,मोगा,पितर यांची भक्ती ही फलदायक होत नाही. ।।टेर।।

**भजन करे तो करे करारो ।। दास भाव सुध होई ।।**
**ग्यान गहे तो फटक पिछाँटी ।। निर्भे मत ले जोई ।।१।।**

सतस्वरुपाचे जर भजन करायचे आहे तर मजबूत पक्के राहून म्हणजे मायेचे कोणतेही भजन न करता सतस्वरुपाचे भजन करा.सतगुरुचा दासभाव ठेवायचा असेल तर मायेचा थोडासाही भाव न ठेवता सतस्वरुपाचा शुध्द दास भाव ठेवा.सतस्वरुप ज्ञान धारण करायचे आहे तर कोरे मायारहीत निर्भय मताचे ज्ञान धारण करा. ।।१।।

त्याग करे तो तज घर आदु || ज्यां सूं हँसो आयो ||
पाँचूं भूत तीन गुण माया || महात्तत जिकण बणांयो ||२||

त्यागायचे आहे तर जगाचे योगी जसे घर त्यागतात तसे घर न त्यागता जेथून हंस पहिल्यांदा मायेत आला त्या विषय विकाराचे आद घर त्यागा.त्यागायचे आहे तर शरीराचे आई,वडिलांना त्यागू नका.ज्याने महतत्त व पाचभूत आकाश,वायू,अग्नी,जल,पृथ्वी बनविले व रजोगुण ब्रम्हा,सतोगुण विष्णु,तमोगुण शंकर ही माया बनविली त्या पारब्रम्ह –रुपी पिता व इच्छारुपी मातेला त्यागा. ||२||

तपस्या करे तो ताव ओ देणो || मन को कयो न कीजे ||
सतगुरू ग्यान कहे ज्यूं करणो || पराभक्त चित दीजे ||३||

तपस्या करायची आहे तर जसे जगाचे तपस्वी शरीराला तपवितात तसे न तपविता मनाला तपवा व मन जे वेद,शास्त्र,पुराण,कुराणच्या करण्या करायला सांगतो ते करु नका व सतगुरु ज्या पराभक्तीचे ज्ञान सांगतात ते करा व त्रिगुणी मायेतून चित्त काढून पराभक्तीत चित्त दया. ||३||

तीरथ करे तो कर अड़सट रे || अेको भूल न जाये ||
तन मन खोज उलट गढ चडणा || ब्रम्ह अगम में न्हाये ||४||

जगाचे लोक धरती पलीकडचे अडुसष्ट तिर्थ करतात ते करु नका.तना मनाला शोधून बंकनाळेने उलटून गडावर चढा व पिंडाला खंड ब्रम्हंड बनवून पिंडातच एकही तिर्थ न सोडता सर्व अडुसष्ट तिर्थ करा.जसे जगात स्त्री पुरुष नद्यांच्या पाण्यात न्हातात तसे न न्हाता ब्रम्ह अग्नीत न्हा.नद्यांमध्ये न्हाईल्याने क्रियेमानाचे काही पाप धुतले जाते परंतु ब्रम्ह अग्नीमध्ये न्हाईल्याने अनंत जन्मापासून आलेले संचित कर्म म्हणजे संचित पाप धुतले जाते.||४||

सेवा करे तो कर नर अेसी || उलट तोय समावे ||
दसवे द्वार बिराजे साहिब || रूम रूम जस गावे ||५||

सेवा करायची आहे तर जसे जगत मंदिरात मायेच्या देवताशी तन मनापासून एक होउन जातात तसे न करता पिंडात उलटून सोहबाचे मंदिर बनवा.हा साहेब दहाव्याद्वारात विराजतो.त्याच्यात हंसाच्या देहाने सदासाठी सामावून जा.जसे जगात मुखाने मायावी देवताचे नाम गातात तसे देहाच्या रोमरोमाने साहेबाचे ररंकार हे अर्धे नाम अखंडित गा. ||५||

ममता मार जिकण अे जाया || सुभ असुभ न दोई ||
धीया प्रण मांड घर अेसो || अमर पूत ज्यां होई ||६||

कन्या जसे लग्न करते व जगात घर बसविते व मुलाला जन्म देते तसेच तू तुझ्या

आत्मकन्येचे सतस्वरुप ब्रम्हच्या सोबत लग्न कर व दसवेद्वार घर बसव जिथे तुला अमरपदरुपी मुलगा होईल. ।।६।।

**सुरे सपूंछी जिण घर बांधो ।। अमर लोक में दूझे ।।**
**तीन लोक में फिरे भटकती ।। ज्यां ने मूरख बूझे ।।७।।**

अमरलोकात दुध देईल म्हणजे सुख देईल असे सुरे सुपंछी म्हणजे अमर देवगाय म्हणजे विज्ञान भक्तीला अमरलोकात बांधा.तीन लोकात मायेचे सुख देते परंतु काळाचे दु:ख थोडेसे ही हलके करत नाही अशी सुरे सुपुंछी म्हणजे देवगाय म्हणजे मायेच्या भक्तीला धारु नका.ही देवगाय स्वत: काळाच्या मुखात तीन लोकात भटकत फिरते व भक्तालाही फिरवते.।।७।।

**मन कुं थोभ निजमन करणा ।। रस बिग्यान पिळावे ।।**
**के सुखराम धार सिर सतगुरू ।। अमर लोक यूं जावो ।।८।।**

हे विकारी मन ३ लोक १४ भवनात विषय विकारात फिरते त्याला थांबवा व या मनाला आनंद रस विज्ञान पाजून पाजून साहेबाचे चौथे लोक प्राप्त करणारे निजमन करा.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री पुरुषांना सांगतात की अशाप्रकारे सर्व विध्या करुन देणाऱ्या सतगुरुला शिरावर धारण करा व अमरलोकात जा. ।।८।।

२५५

।। पदराग बिलावल ।।

**ओ तेरे क्या न्यांव है**

**ओ तेरे क्या न्यांव हे ।। सुण लीज्यो सांई ।।**
**नुगरा नर राज स करे ।। जन भिखण जाई ।।टेर।।**

साई तुम्ही सर्व सृष्टीचे मालक आहात व तुम्ही सर्व जीवांचे उत्पतीकर्ता आहे व सर्वाचं तुम्ही पोट भरता मग तुमचा असा कसा न्याय आहे?नुगरा म्हणजे ज्याला तुम्ही उत्पन्न केलं गर्भात त्याचे रक्षण केले व तो तुमची भक्ती करीत नाही व जे तुम्हाला आवडत नाही असे सर्व शोधुन शोधुन निचाहुन निच कर्म करतो तो जीव राजा महाराजा सारखे सर्व सुख भोगतो व जो सुगरा आहे म्हणजे तुमची भक्ती निजमनाने करतो तो हलक्याहुन हलके सर्व दु:ख भोगतो.त्याला पोट भरण्यापुरते ही खायला मिळत नाही.त्याला पोट भरण्याकरिता भिक्षा मागावी लागते अरे साई असा कसा तुझा न्याय आहे.।।टेर।।

**जन दुखियाँ तो हि भला ।। मेरी भगत कमावे ।।**
**अमरा पुर ले जाव सूं ।। जुग जुग सुख पावे ।।१।।**

साई म्हणाले माझा हा संत दु:खी आहे,कष्टात आहे तरी तो चांगला आहे,तो महासुखाच्या देशाला जाण्याची भक्ती कमवितो आहे.त्याला मी अमरापुर घेऊन

जाईल.मग तो तेथे युगान युग अनंत महासुख भोगेल. ।।१।।

**जन कूं माया राज द्युं ।। तो सबही मुज माने ।।**
**नरक कुंड खाली रहे ।। जुगमें कुण जामे ।।२।।**

जर मी माझ्या संताना माया दिली तर हे कुकर्मी,नीचकर्मी,विषय विकारी जीवही धन, माल,मायेकरीता माझी भक्ती करतील परंतु मी सतन्यायाने विचार करुन आदिपासुन संताकरिता अमर लोक व ह्या कुकर्मी,नीचकर्मी विषय विकारी जीवांकरिता नरककुंड व चौऱ्याशी लक्ष योनीचे महादु:ख बनविले आहे निचकर्मी जीवांनाही मी अमरलोकात घेऊन गेलो तर मग मी सतन्यायाने बनविलेल्या नरक कुंडात व चौऱ्याशी लक्ष्य योनीत कोणाला टाकू.त्यामुळे हा मी बनविलेला नरककुंड खाली राहिल.त्याचप्रमाणे चौऱ्याशी लक्ष योनीत कोण जन्मेल अशा प्रकारे स्वामीने प्रश्नकर्त्या संताना उत्तर दिले. हे उत्तर त्या प्रश्नकर्त्या संताच्या समाधाना पुरते दिलेले आहे.उत्तर सर्व जीवांसाठी दिलेले नाही.कारण स्वामीला सर्व जीव परमपदाला न्यायचे आहे.हे प्रश्नकर्त्याच्या प्रसंगाप्रमाणे प्रश्नकर्त्याचे समाधान व्हावे व भक्ती बाबतीत शंका उभी राहू नये म्हणून उत्तर दिले आहे.।।२।।

**देऊं तोई लेवे नही ।। मेरा जन माया ।।**
**जा सुख जाण्या पीव का ।। जा ने ओर न भाया ।।३।।**

मी माझ्या संतांना धन माल देने चाहतो तरीही माझे संत ती धनमाल घेणे चाहत नाही.ते भुकेले राहणे पसंद करतात परंतु ज्या धनमालाने भक्तीमध्ये अंतर पडते,बाधा उत्पन्न होते,भक्ती करण्याचा स्वभाव नष्ट होतो अशी कोणती ही सुखाची वस्तु घेणे चाहत नाही,घेत नाही.जसे स्त्रीने पतीचे खरे सुख जाणले आहे तिला अन्य स्त्रीयां सारखे दागिने,कपडे, बाहेर फिरणे इत्यादित रुची राहत नाही व त्यात आनंद येत नाही अशा पत्नी करीता पतीने दागिने,कपडे,बाहेर फिरणे इत्यादिमध्ये पत्नीमध्ये रुची आणण्याचा प्रयत्न ही केला तरीही तिच्यात रुची येत नाही असेच माझ्या भक्तांना मी मायेचे सुख कितीही दिले तरी मायेचे विषय विकारांच्या सुखात प्रिती येत नाही. ।।३।।

**माया भगती एकटी ।। भेळी नहि रे हे ।।**
**इण कारण सुखराम के ।। जन कूं दुख देहे ।।४।।**

भक्ताला पती परमात्म्याच्या सुखाच्या आनंदापुढे मायेच्या धनमालाचे सुख जरासेही आवडत नाही उलट मायेचे धनमालाचे सुख हिन वाटतात तुच्छ वाटतात व हे सुख घेण्यात ग्लानी येते.ह्या भक्ताला साहेब जसा ठेवतो म्हणजे मायेमध्ये सुखात ठेवो किंवा दु:खात ठेवो त्या साहेबाच्या ठेवण्यात त्याला संतोष राहतो,आनंद उत्पन्न होत असतो म्हणुन हा भक्त माया प्राप्ती करिता जरासेही उपाय करीत नाही परंतु भक्ती

करिता मोठ्याहुन मोठे कोणतेही उपाय करणे सोड्त नाही.या संताच्या स्वभावाने भक्ती व धनमाल दोन्ही विपरीत वस्तु संतांच्या घरी एके ठिकाणी मिळुन वास करीत नाही.संतांना भक्तीचे सुख मिळत असतात व मायेचे दुःख पड्त असतात व हे दुःख जगाला जाणवतात परंतु हेच दुःख संतांना जरासेही जाणवत नाही उलट संताला मी खुप सुखी आहे असे जाणवत असते.।।४।।

२९७

।। पदराग बिहगडो ।।

राम तेरी दाय पड़े जुं किजे

राम तेरी दाय पडे जुं कीजे ।। भावे मोख मुगत हर मेलो ।।

भावे दोजख दीजे ।। राम तेरी दाय पडे जुं कीजे ।।टेर।।

रामजी आपल्याला मला मोक्षाला पाठवणे चांगले वाटल्यास मोक्षास पाठवा किंवा नरकात पाठवणे चांगले वाटत असल्यास नरकात पाठवा.मी तर आपलीच भक्ती करीन आपली भक्ती कधी ही सोड्णार नाही. ।।टेर।।

मो कूं तो हरि भगत ज करणी ।। भजन अखंडत तेरो ।।

मोखु सियाँसुं बिड़द बदे तो ।। कांई बिगड सी मेरो ।।१।।

मला तर रामजी आपली भजन भक्ती अखंड्ति करायची आहे.माझ्या लुटून जाण्याने आपले ब्रीद वाढत असेल तर माझे लुटून जाण्याने माझे काहीच बिघड्णार नाही. ज्याच्याने आपली ब्रीद वाढेल तेच आपण करा. ।।१।।

जब लगं मुख में जिभ्या चाले ।। तब लग हर हर के सूं ।।

भावे तार मार भावें खीजो ।। सरण आप की रह सूं ।।२।।

मी माझ्या मुखात जोपर्यंत जीभ चालेल तोपर्यंत मुखाने रामराम उच्चारण करेल आपण माझ्यावर प्रेम करा,कोध करा किंवा मारा जे आपल्यास वाटेल ते करा परंतु मी तर आपल्याच शरणात राहील.आपण काहीही केले तरी ही मी आपला शरणा सोड्णार नाही. ।।२।।

भावे आप ओदसा भेजो ।। भांवे मुज बिट मावो ।।

सतगुरू सरण नांव नहि छाडू ।। ऊथल पुथल होय जावो ।।३।।

आपणास माझी वाईट दशा बघणे चांगले वाटते तर मला वाईट दशेत ठेवा.आपणास माझे हसू होणे बघण्यात चांगले वाटते तर माझे घरात,समाजात हसी होऊ द्या.मी तर सतगुरुजी तीन लोक ही माझ्याशी उलट पलट झाले तरी ही मी आपला शरणा व आपण सांगीतलेले रामनाम सोड्णार नाही. ।।३।।

सुख दुख ताव बोहोत दो साई ।। भावे देहे धर कूटो ।।

केहे सुखराम भगत नहि छाडूं ।। जे तीन लोक रहे रूठो ।।४।।

आपण रामजी मला दु:ख जितके द्यायचे तितके द्या.वाटल्यास देह धारण करुन मला कुटा(मारा)आपल्याला मला जो त्रास द्यावयाचा आहे तो त्रास द्या परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे रामजी मी आपली भक्ती सोड्णार नाही. आपली भक्ती करण्याचे स्वर्गाचे सर्व देव,पाताळाचे सर्व नाग आणि मृत्युलोकाचे सर्व नर–नारी(स्त्री–पुरुष)माझ्यावर नाराज होतात रुसतात तरी त्यांना नाराज होउ देईल. परंतु मी आपला शरणा व भक्ती सोडणार नाही. ।।४।।

३१६

।। पदराग कल्याण ।।

**साधो भाई स्मझ सोच रहो गाढ़ा**

**भेदी बीना बात मती मानो ।। सब ही फिरत हे आड़ा ।।टेर।।**

अरे साधू भाऊ अमरलोकात पोहचविणारे भेदी म्हणजे जाणकार संताच्या शिवाय अन्य ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती,अवतार,ओअम,सोहमचे पोहचवाले सर्व ज्ञानी,ध्यानी,साधू, सिध्दांची गोष्ट मानू नका.हे सर्व परममोक्ष प्राप्त करण्याच्या आड्वे फिरतात म्हणजे जीवाला परममोक्ष प्राप्त करण्यापासून दूर ठेवतात. ।।टेर।।

**आपो खोज आप नही चीन्या ।। तब लग माया पूजे ।।**

**बंक नाळ होय उलट न चडीया ।। जब लग नाव न सूजे ।।१।।**

जोपर्यंत तू स्वत:चा ब्रम्ह शोधत नाही म्हणजे आत्म्याचे परमात्मा आहे हे ओळखत नाही तोपर्यंत तू जगाचे सर्व जीव जसे परममोक्ष न मिळणारी मायेची भक्ती करतात तसेच तु ही भक्ती करुन राहिला आहे हे समज तू आपल्या तनातच बंकनाळने होवून उलटून चढत नाही तोपर्यंत स्वत:च्या ब्रम्हमध्ये सत परमात्मा ओतप्रोत भरलेला आहे हे सुजत नाही. ।।१।।

**भ्रमावण कूं से कुळ जग हे ।। स्मझावे जन बिर्ळा ।।**

**छुछम बेद के भेद बिना रे ।। सब माया का किरळा ।।२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की कुळाचे सर्व लोक,जगाचे स्त्री,पुरुष व ज्ञानी,ध्यानी,ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती इत्यादी मायेच्या भक्त्यांमध्ये थोडेसेही काळाचे दु:ख नाही आहे उलट काळाचे दु:ख निवारण करुन सदा सुख देण्याची रित आहे असे समजतात व या मायेच्या भक्तीशिवाय दुसरी कोणती भक्ती सदा दु:ख निवारण करुन सुख देणारी आहेच नाही असे जगात भ्रम उपजवितात.हे महासुखाचा सतस्वरुपाचा सुक्ष्मवेदाचा भेद थोडासा ही जाणत नाही याकरीता या सर्वांचे ज्ञान काळाच्या मुखातून काढणारी बिना कामाची खोटी गलबलाट आहे.हे काळातून काढणारे परममोक्षाचे खरे ज्ञान नाही आहे.।।२।।

**बावन हरफ बेद का कहीये ।। ओऊँ अजपो ऊला ।।**

अबगत अलख निरंजण गावे ।। भेद बिना सब भूला ।।३।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,वेदात सांगितलेल्या सर्व करण्या ह्या ५२ अक्षर या मायेच्या पराक्रमाने बनलेल्या आहे.हा ५२अक्षरांचा ओअम या मायेच्या शब्दापासून जन्मलेला आहे व ओअम हा ज्याला जपले जात नाही असे अजपा या मायेपासून जन्मला आहे.हा अजपा स्वत: काळस्वरुप पारब्रम्ह आहे.हा काळस्वरुप पारब्रम्ह मायेच्या सोबत भोग करुन सृष्टीची रचना करतो व वेळेनुसार काळ बनून सृष्टीला खातो असा हा अस्सल माया आहे.अशा पारब्रम्ह होनकाळ ईश्वरला कोणी ज्ञानी,ध्यानी अविगत म्हणतात तर कोणी ज्ञानी,ध्यानी अलख म्हणतात तर कोणी ज्ञानी,ध्यानी निरंजन म्हणतात व मायेच्या पलीकड्चा वैरागी आहे असे समजतात परंतु हे ज्ञानी,ध्यानी हा होणकाळ पारब्रम्ह ईश्वर सतनामाच्या इकड्ची सृष्टी उत्पन्न करणारी असली माया आहे हे नाही समजत. ।।३।।

ब्रम्हा बिस्न महेसर सक्ती ।। येहे च्यारुं ने धारा ।।
अड्वां फाड़ निसरे बारे ।। सो जन उतरे हे पारा ।।४।।

अशा प्रकारे सतनाम विसरुन गेल्या कारणाने सर्व जगाचे स्त्री,पुरुष,ज्ञानी,ध्यान्यांनी ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती या चारींना धारण करुन घेतले आहे परंतु हे ब्रम्हा,विष्णु, महादेव,शक्ती जीवाला परममोक्ष प्राप्त करण्याकरीता आड्वे आहेत हे जीव समजू शकत नाही.जसे शेतात पिक पूर्ण तऱ्हेने फुललेले असते ते पिक पक्ष्यांच्या भूक निवारण करण्याकरीता भरपूर असते परंतु ते पिक पक्ष्यांनी खायला नको पाहिजे याकरीता मनुष्याचा बांबूचा पुतळे करुन त्याला कपडे घालून शेतात जागो जागी गाडून उभे करतात.या मनुष्य शरीरासारखे खोटे पुतळे पाहून काही पक्षी भूक लागल्यावर ही भूकेले राहतात परंतु त्या झुडूपांजवळ जात नाही.(अशा पक्ष्यांना धान्य खायला थांबवण्यासाठी मनुष्याच्या पुतळ्यांना आड्वे म्हणतात.)याचे प्रकारे ८४ लक्ष योनी भोगून मनुष्य देहात आल्यावर ज्या परममोक्ष फळाची भूक लागलेली होती ते फळ खावू शकतात परंतु हे ब्रम्हा,विष्णु,महादेव व शक्ती आड्वे बनतात व ज्या जीवाला भूक लागलेली आहे त्या जीवाला परममोक्ष फळ खाण्यापासून थांबविण्यासाठी मायेचे पर्चे चमत्कार देवून भुलवून देतात.जो पक्षी ह्या पुतळ्यांना मनुष्याचे खोटे पुतळे समजून या पुतळ्यांचा भय ठेवत नाही ते सर्व पक्षी धान्याला खावून तृप्त होवून जातात असेच जो जीव या ब्रम्हा,विष्णु, महादेव व शक्ती इत्यादी देवतांच्या पर्चे चमत्कारांना मानत नाही व यांना घाबरत नाही व यांच्या पलीकड्च्या ने:अक्षर देवताची भक्ती करतात ते सर्व भवसागरातून पार उतरुन जातात. ।।४।।

भणिया खरा गुण्या नही कोई ।। जब लग काम न आवे ।।

के सुखराम भेद बिन भजीयाँ ।। प्रममोख नही पावे ।।५।।

ब्रम्हाचे वेद,शंकराचे शास्त्र,शक्तीचा लबेद,वेद व्यासाचे पुराण इत्यादी कित्येक वेळा वाचून घेतले आणि वाचून प्रविण होवून गेले परंतु या ५२अक्षराचे ज्ञान ओअम,सोहम अजपात परममोक्ष नाही आहे हे जो पर्यंत गुणत नाही म्हणजे ज्ञानाने समजत नाहीत तोपर्यंत हे सर्व वाचणे मोक्ष प्राप्तीसाठी काही कामाचे नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की,सतनामाच्या भेदाशिवाय ५२ अक्षराच्या करण्या ओअम, सोहम, अजपा,ब्रम्हा,विष्णु, महादेव,शक्ती,अवतारांचे ज्ञान ज्यात परममोक्षाचा भेद नाही आहे अशा ज्ञानाला भजून परममोक्ष मिळणार नाही.परममोक्ष सतनामाला भजूनच मिळेल म्हणून परममोक्ष चाहणारे सर्व साधू भाऊ ५२ अक्षरांच्या करण्या ओअम, सोहम, अजपा हे माया आहे यात परममोक्ष प्राप्त करण्याची विधी नाही आहे हे समजा व समजून विचार करा आणि पक्के राहून परममोक्षाच्या भेदीशिवाय कोणतेही माया व ब्रम्हचे ज्ञानी,ध्यानी,स्त्री,पुरुषांची गोष्ट मानू नका.।।५।।